# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

July 2025 / Issue No. 06 | Price : Rs. 30/-




ESTD 1927
**MACCIA**
Apex Chamber of the State
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

CELEBRATING 100 YEARS
**100**

## शताब्दी महोत्सव शुभारंभ

## नुतनीकृत मुख्यालय शुभारंभ

## सहकारी व शासकीय औद्योगिक वसाहती राज्यस्तरीय परिषद



शताब्दी महोत्सव शुभारंभ
नूतनीकृत मुख्यालय शुभारंभ
सहकारी व शासकीय औद्योगिक वसाहती राज्यस्तरीय परिषद
शुक्रवार, २० जून २०२५
यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई
CELEBRATING 100
ESTD 1927
& AGRICULTURE
महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स,



विकसित भारतामध्ये
कृतीशील सहभाग
YEARS
शुभहस्ते
मा. ना. अमितभाई शाह
गृह व सहकार मंत्री, भारत सरकार
मा. ना. देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
मा. ना. पियुषजी गोयल
वाणिज्य व उद्योग मंत्री, भारत सरकार
प्रमुख उपस्थिती
मा. ना. एकनाथजी शिंदे
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
मा. ना. अजितदादा पवार
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
मा. ना. मुरलीधर मोहोळ
सहकार व नागरी उड्डाण राज्यमंत्री,
भारत सरकार
मा. ना. मंगलप्रभातजी लोढा
कौशल्य, रोजगार व उद्योजकता मंत्री,
अध्यक्ष







◆ 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अँग्रीकल्चर' च्या नुतनीकृत कार्यालयाच्या कोनशिलेचे उद्घाटन करताना व दुसऱ्या छायाचित्रात सहकारी व औद्योगिक वसाहती राज्यस्तरीय परिषदेचे रिमोट द्वारे उद्घाटन करताना केंद्रीय गृह व सहकार मंत्री नाम. अमित शाह सोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ,विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर,उद्योगमंत्री उदय सामंत, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, अध्यक्ष ललित गांधी व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे व्यवस्थापकीय संचालक मंडळ

CELEBRATING 100 YEARS

MACCIA ESTD 1927
Apex Chamber of the State
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

July 2025/ Issue No. 06

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अँग्रिकल्चर**

ओरिकॉन हाऊस, ६ वा मजला, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मार्ग, काळा घोडा, फोर्ट, मुंबई- ४००००१
फोन : (०२२) २२८५५८५९/६०
ई-मेलः maccia@maccia.org.in
वेबसाईट : www.maccia.org.in

**संपादकीय समिती**

- अध्यक्ष व संपादक
  **ललित गांधी**
- वरिष्ठ उपाध्यक्ष
  **रविंद्र माणगावे**
- उपाध्यक्ष
  **करूणाकर शेट्टी** **शंकर शिंदे**
  **संजय सोनवणे** **संगीता पाटील**
  **रमाकांत मालु** **दिलीप गुप्ता**
  **प्रफुल्ल मालाणी** **श्रीकृष्ण परब**
- **सौ. निलाक्षी राधाकृष्णन,** सरकार्यवाह
- सहसंपादक : **अविनाश पाठक**

- **उत्तर महाराष्ट्र विभागीय कार्यालय**
  ४९, पाचवा मजला, बिजनेस बे, श्रीहरी कुटे मार्ग, मुंबई नाका, नाशिक - ४२२००१
  फोनः (०२५३)२५७७७०४
- **पूणे जिल्हा कार्यालय**
  प्लॉट नं. ईएल-१५, एमआयडीसी, भोसरी, पूणे - ४११०२६.
- **जळगांव जिल्हा कार्यालय**
  २१-ए,श्रीराम स्टेट बँक कॉलनी, रिंगरोड, जळगाव - ४२५००१
- **कोल्हापूर जिल्हा कार्यालय**
  बिझनेस हाऊस, राजारामपूरी १० वी गल्ली, कोल्हापूर - ४१६००८
- **बारामती उप-जिल्हा कार्यालय**
  प्लॉट नं. सी–८८, हॉटेल सुर्या जवळ, एमआयडीसी भिंगवान रोड, बारामती, पुणे – ४१३१३३

**इतर कार्यालय** : अंधेरी (मुंबई), नवी मुंबई, ठाणे, पालघर, धुळे, रत्नागिरी, पलुस (सांगली)

**Note :** Articles published in this bulletin do not necessarily reflect the views of the Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture.

## अंतरंग

१. महाराष्ट्र चेंबरच्या नुतनीकृत मुख्यालयाचे गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते उद्घाटन
२. 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अँग्रीकल्चर' ने आयोजित केलेली सहकारी औद्योगिक वसाहतींसाठी परिषद परिणामकारक - नाम. अमित शाह
३. महाराष्ट्र चेंबरच्या अध्यक्षपदी ललित गांधी यांची सलग चौथ्यांदा बिनविरोध फेरनिवड
४. प्रेरणादायी उद्बोधन... : मान. नाम. अमितभाई शाह
५. दृष्टीकोन...महाराष्ट्राच्या विकासाचा.. : मान. नाम. देवेंद्रजी फडणवीस
६. ऊर्जावान संबोधन... : मान. नाम. एकनाथजी शिंदे
७. कोल्हापूर खंडपीठाच्या मागणीला सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सकारात्मक पाठिंबा : ललित गांधी
८. कोल्हापूर खंडपीठासाठी लवकरच संयुक्त बैठक घेऊ : केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन मेघवाल
९. महाराष्ट्र चेंबरच्या मागणीला प्राडाचा सकारात्मक प्रतिसाद : ललित गांधी
१०. प्राडा ग्रुप महाराष्ट्र भेटीवर येणार : ललित गांधी
११. प्राडा अन् कोल्हापुरी चपलेची जागतिक वीण जुळेल

# संपादकीय..



**'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स'** च्या इतिहासातील सुवर्णाक्षरांनी नोंद करावयाच्या महत्वपूर्ण दिवसांपैकी एक सुवर्णदिन ठरला **२० जुन २०२५**, महाराष्ट्र चेंबरच्या आरंभीच्या काळातील वाटचालीत संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांच्या सहकाऱ्यांपैकी महत्वपूर्ण सहकारी व चेंबरचे माजी उपाध्यक्ष स्व. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांच्या जन्मदिनाचे औचित्य जुळून येऊन घडलेला **'शतकमहोत्सव शुभारंभ'** चा शानदार समारोह.

राज्याच्या व देशाच्या व्यवस्थेतील निर्णय प्रक्रियेतील सर्वोच्च स्थानी असणाऱ्या मान्यवरांनी 'महाराष्ट्र चेंबर' च्या कार्यक्रमांमधून सहभागी होण्याच्या वैभवशाली परंपरेत मानाचा तुरा रोवला गेला. भारताच्या सर्वोच्च स्थानी असणाऱ्या दोन शक्तिशाली नेत्यांपैकी एक अशी ओळख असलेले केंद्रीय गृह व सहकारी मंत्री माननीय नामदार अमितभाई शाह यांच्या उत्साहपूर्ण उपस्थितीने.

त्याचप्रमाणे राज्याचे कर्तुत्ववान व प्रभावी मुख्यमंत्री नाम. देवेंद्रजी फडणवीस, लोकप्रिय जननायक उपमुख्यमंत्री नाम. एकनाथजी शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, केंद्रीय नागरी उड्डयन राज्यमंत्री नाम. मुरलीधर मोहोळ, राज्याचे उद्योगमंत्री नाम. उदयजी सामंत, सांस्कृतिक कार्य व माहीती तंत्रज्ञान मंत्री नाम. आशिषजी शेलार, कौशल्य विकास मंत्री नाम. मंगलप्रभातजी लोढा अशा दिग्गज मान्यवरांच्या एकाचवेळी एका व्यासपीठावर उपस्थितीने 'महाराष्ट्र चेंबर' च्या शतकमहोत्सव शुभारंभाची उंची वाढविली.




राज्याच्या अर्थकारणाचा पाया भक्कम करणाऱ्या व औद्योगिकरणाचा पाया रचणाऱ्या 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' ची स्थापना भारतीय उद्योग जगतातील आश्चर्यकारक नेतृत्व शेठ वालचंद हिराचंद यांनी केली. ते व त्यांच्या परंपरेतील अनेक दिग्गजांनी गौरवान्वित केलेल्या अध्यक्षीय परंपरेत ४० वा 'अध्यक्ष' म्हणून सेवा करण्याची संधी मिळाली हीच मुळी अतिमहत्वपूर्ण घटना.

ज्या संस्थेने 'महाराष्ट्र' घडवला त्याचे नेतृत्व करण्याची संधी 'कोल्हापूर' सारख्या छोट्या शहराला मिळावी हा नियती, नेतृत्व व कर्तुत्वाचा अनोखा मिलाप ठरला.

अशा संस्थेच्या शतकमहोत्सवाचा शुभारंभ सोहळा साजरा होताना अध्यक्षपदाची जबाबदारी चौथ्यांदा स्विकारताना ती केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शाह यांच्यासारख्या एका शक्तिशाली नेतृत्वाच्या हस्ते स्विकारण्याचा क्षण माझ्या जीवनातील अविस्मरणीय व सर्वोच्च समाधानाची अनुभुती व जबाबदारीच्या जाणीवेबरोबर या नेतृत्वाच्या कालखंडात मिळालेले भक्कम पाठबळ याचा गौरव देणारी घटना ठरली.

महाराष्ट्र चेंबरच्याच पुढाकाराने अस्तित्वात आलेली सहकारी औद्योगिक वसाहतींची संकल्पना, या संकल्पनेला मुर्त स्वरूप देण्याबरोबरच संघटना बांधणी व अशा संघटनेला कार्यालयीन जागेसह सर्वच बळ पुरविणाऱ्या 'महाराष्ट्र चेंबर' ने या वसाहतींचे प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला व शतकमहोत्सवानिमित्त करावयाच्या विविध आयोजनामध्ये पहिला मान सहकारी औद्योगिक वसाहतींच्या राज्यस्तरीय परिषद आयोजनातुन दिला.

महाराष्ट्र चेंबर व उद्योग मंत्री यांच्या विकास यात्रेतील अद्भुत समन्वयामुळे या वसाहतींचे अनेक वर्षे प्रलंबित प्रश्न महाराष्ट्र चेंबरच्या पुढाकाराने शतकमहोत्सवाच्या व्यासपीठावर सुटले. उद्योगमंत्री उदयजी सामंत यांनी त्वरीत निर्णयाची परंपरा याहीवेळी जपली.

दोन वर्षे चालणाऱ्या या शतकमहोत्सव समारंभानिमित्त महाराष्ट्राच्या अर्थकारणाला स्पर्श करणाऱ्या प्रत्येक विषयांवरील राज्य–राष्ट्रीय स्तरांवरील आयोजनांच्या माध्यमातुन या सर्व क्षेत्रांच्या विषयांना चालना देऊन महाराष्ट्राच्या विकासात पर्यायाने भारताच्या विकासात आपले सर्वोच्च योगदान देऊन विकसित महाराष्ट्र व विकसित भारत घडविण्याच्या अभियानात महाराष्ट्र चेंबर सक्रीय असेल याचा विश्वास व्यक्त करतो.

धन्यवाद !

ललित गांधी

**अध्यक्ष**




◆ **'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रीकल्चर' द्वारा आयोजित शताब्दी महोत्सव शुभारंभ, नुतनीकृत मुख्यालय शुभारंभ व सहकारी व औद्योगिक वसाहती राज्यस्तरीय परिषद समारंभाप्रसंगी मार्गदर्शन करताना केंद्रीय गृह व सहकार मंत्री नाम. अमित शाह सोबत मंचावर उपस्थित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ,विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर,उद्योगमंत्री उदय सामंत, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, अध्यक्ष ललित गांधी आदि.**

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या शताब्दी महोत्सवाची शानदार सुरूवात

# महाराष्ट्र चेंबरच्या नुतनीकृत मुख्यालयाचे गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते उद्घाटन

**मुंबई :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रीकल्चरच्या शताब्दी वर्षानिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटर येथे महाराष्ट्र चेंबरच्या नुतनीकृत मुख्यालयाचे व 'सहकारी व शासकीय औद्योगिक वसाहती राज्यस्तरीय परिषदे'चे उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते झाले.

परिषदेस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, केंद्रीय सहकार आणि नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उद्योग, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, कौशल्य, रोजगार व उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, उपाध्यक्ष शंकर शिंदे, उपाध्यक्ष संजय सोनवणे, उपाध्यक्ष सौ संगीता पाटील, उपाध्यक्ष श्रीकृष्ण परब, उपाध्यक्ष दिलीप गुप्ता, उपाध्यक्ष रमाकांत मालू, उपाध्यक्ष प्रफुल्ल मालानी, व्यवस्थापन समिती सदस्य विजय वेदमुथा, कांतीलाल चोपडा, सरकार्यवाह निलाक्षी राधाकृष्णन उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्या विकासात्मक कामांमुळे मुंबईच्या पायाभूत विकासात अमुलाग्र बदल होत आहेत. मेट्रो, अटल सागरी सेतू, कोस्टलरोड करतानाच पुनर्विकासाची कामे वेगात सुरु आहेत. यामुळे मुंबईची पूर्वीची ट्रॅफिक,




◆ **समारंभाप्रसंगी मार्गदर्शन करताना महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोबत व्यासपीठावर मान्यवर**

वाढत्या लोकसंख्येमुळे होणारी चिंताजनक स्थिती बदलू लागली आहे.

इंग्रज सत्ता काळात उद्योग व विकासासाठी 'चेंबर्स ऑफ कॉमर्स'ने केलेले काम बहुमोल असून आगामी शंभर वर्षात देखील देशाच्या अर्थव्यवस्थेला उच्च स्थानावर नेण्यात महत्त्वाची जबाबदारी निभावेल. महाराष्ट्राच्या विकासासाठी केंद्राने लॉजिस्टिक पार्क, देशातील ११ पैकी तीन औद्योगिक कॉरीडोर, बारा पैकी सात टेक्स्टाईल पार्क महाराष्ट्रात दिले असल्याचे केंद्रीय मंत्री शाह म्हणाले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड अॅग्रीकल्चर संस्थेने उद्योग, व्यापार आणि शेतीच्या क्षेत्रात नवे उद्यमी तयार करण्याची मुहूर्तमेढ रोवली. देशात अनेक चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री नाव असलेल्या संस्था आहेत. पण कॉमर्स, इंडस्ट्री अँड अॅग्रीकल्चर असे एकत्रित नाव असलेली ही एकमेव संस्था असून, याच संस्थेच्या माध्यमातून 'फिक्की' सारख्या संस्थेची निर्मिती झाली. अशा प्रकारे उद्योग व व्यापाराचे भारतीयीकरण करण्याच्या हेतूने १०० वर्षांपूर्वी सुरू झालेली ही संस्था आज अतिशय गौरवाने उभी आहे, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संस्थेचे अभिनंदन केले व भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

शेठ वालचंद हिराचंदजी यांचे स्मरण अतिशय महत्त्वाचे आहे, कारण देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या भूमिपुत्रांपैकी ते एक आहेत. त्यांनी या संस्थेची निर्मिती केली व हजारो लोकांना प्रेरणा दिली. लोकांना 'फियाट' माहिती होती, त्या काळात संपूर्ण भारतीय बनावटीची 'प्रीमियर पद्मिनी' कार तयार करण्याचे काम शेठ वालचंदजी यांनी केले होते. शेठ वालचंदजी यांनी स्थापन केलेल्या हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड किंवा हिंदुस्तान शिपयार्ड लिमिटेड या कंपन्या आज राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर देशाच्या सेवेत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये या दोन्ही कंपन्यांचा अतिशय मोलाचा वाटा आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. तसेच, शेठ वालचंदजी यांनी रोपटे लावलेल्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड अॅग्रीकल्चर या संस्थेचे आताचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वात या संस्थेसाठी १०० वे वर्ष ऐतिहासिक ठरेल, असा विश्वासही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात देशाच्या विकासात महाराष्ट्राने मोठी भूमिका बजावली असून राज्याची अर्थव्यवस्था १२ लक्ष कोटी रुपयांवरून चाळीस लक्ष कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

महाराष्ट्रात पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करतानाच, विविध योजना व उपक्रमांच्या माध्यमातून व्यापार




◆ **समारंभाप्रसंगी मार्गदर्शन करताना महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोबत व्यासपीठावर मान्यवर**

व उद्योगासाठी पोषक वातावरण तयार केले आहे. तात्काळ निर्णय घेणारे आणि उद्योग वाढीसाठी सुरक्षित वातावरण देणारे हे राज्य असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. स्वदेशी व्यापार उद्योगांना संरक्षण मिळावे, प्रोत्साहन देण्याच्या हेतूने शेठ वालचंद यांनी १९२७ साली महाराष्ट्र चेंबर स्थापना केली. शेठ वालचंद यांच्या कार्याचा आढावा घेतला. शेठ वालचंद यांना भारतरत्न, पद्मश्री पुरस्कार देऊन सन्मानित करावे, तसेच सोलापूर विमानतळाला शेठ वालचंद हिराचंद यांचे नाव द्यावे अशी मागणी अध्यक्ष ललित गांधी यांनी केली. गेल्या ९८ वर्षात महाराष्ट्र चेंबरने व्यापारी, उद्योजक, कृषी क्षेत्र, सेवा क्षेत्रासाठी केलेल्या कार्याची माहिती दिली. राज्यातील व्यापार उद्योगाला जगाच्या बाजारपेठेत स्थान मिळवून देण्यात महाराष्ट्र चेंबरची भूमिका महत्वाची असल्याचे सांगितले.

सहकार व गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते महाराष्ट्र चेंबरच्या अध्यक्ष पदाची ट्रॉफी अध्यक्ष ललित गांधी यांनी स्विकारली.




◆ **समारंभाप्रसंगी मार्गदर्शन करताना अध्यक्ष ललित गांधी सोबत व्यासपीठावर मान्यवर**




◆ **'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रीकल्चर' द्वारा आयोजित शताब्दी महोत्सव शुभारंभ, नुतनीकृत मुख्यालय शुभारंभ व सहकारी व औद्योगिक वसाहती राज्यस्तरीय परिषद समारंभाचे दिप्रज्वलन करून उद्घाटन करताना केंद्रीय गृह व सहकार मंत्री नाम. अमित शाह सोबत मंचावर उपस्थित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उद्योगमंत्री उदय सामंत, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, अध्यक्ष ललित गांधी आदि.**

# 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रीकल्चर' ने आयोजित केलेली सहकारी औद्योगिक वसाहतींसाठी परिषद परिणामकारक - नाम. अमित शाह

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ने केलेल्या सर्व मागण्या मान्य - उदय सामंत

**मुंबई** : महाराष्ट्राच्या उद्योग, व्यापार जगताची शिखर संस्था असलेल्या 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रीकल्चर' ने त्यांच्या शतकमहोत्सवाच्या औचित्याने आयोजित केलेल्या सहकारी, शासकीय औद्योगिक वसाहत राज्यस्तरीय परिषदेच्या माध्यमातुन औद्योगिक वसाहतींचे प्रश्न परिणाम कारकरीत्या केंद्र व राज्य सरकारपर्यंत पोहोचले असुन सहकार क्षेत्रातील औद्योगिक वसाहतींच्या विकासासाठी केंद्र व राज्य सरकार सक्रीय सहभागिता करेल अशी ग्वाही केंद्रीय गृह व सहकार मंत्री नाम. अमित शाह यांनी दिली.

राज्यस्तरीय परिषदेचे रीमोटद्वारे उद्घाटन करून नाम. अमित शाह यांनी या आयोजनाचे कौतुक केले. परिषदेचे मुख्य मार्गदर्शक राज्याचे उद्योगमंत्री नाम. उदय सामंत यांनी






◆ **'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रीकल्चर' द्वारा आयोजित शताब्दी महोत्सव शुभारंभ, नुतनीकृत मुख्यालय शुभारंभ व सहकारी व औद्योगिक वसाहती राज्यस्तरीय परिषद समारंभाचे दिप्रज्वलन करून उद्घाटन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी आदि.**




◆ **'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चर' द्वारा आयोजित शताब्दी महोत्सव शुभारंभ, नुतनीकृत मुख्यालय शुभारंभ व सहकारी व औद्योगिक वसाहती राज्यस्तरीय परिषद समारंभ प्रसंगी मार्गदर्शन करताना महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री मान. नाम. उदयजी सामंत व्यासपीठावर उपस्थिती मान्यवर**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ने औद्योगिक वसाहतींचे मांडलेले सर्व प्रश्न मार्गी लावण्याची ग्वाही देऊन ललित गांधी यांनी केलेल्या विविध मागण्या मंजूर केल्याची घोषणा केली.

सहकारी औद्योगिक वसाहतींच्या पायाभुत सुविधांसाठी अ, ब व क वर्गाच्या सहकारी औद्योगिक वसाहतींना २५ टक्क्यांऐवजी फक्त १० टक्के भरण्याची मागणी मान्य केली तसेच डी व डी प्लस श्रेणीतील औद्योगिक वसाहतींना २५ टक्क्यांऐवजी ५ टक्के एवढी नाममात्र रक्कम भरण्याची मागणी मान्य केल्याचीही घोषणा केली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चर चे अध्यक्ष ललित गांधी यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात महाराष्ट्र चेंबरच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेत आपल्या तीन वर्षाच्या अध्यक्षीय कारकीर्दीत उद्योग विभागाने व उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सर्वाधिक सहकार्य केल्याचे आवर्जुन नमुद केले व सहकारी औद्योगिक वसाहतींच्या २०-२५ वर्षापासुन प्रलंबित मागण्या तात्काळ सोडविण्याची मागणी केली. महाराष्ट्र चेंबर ने सहकारी औद्योगिक वसाहतींची संकल्पना १९५५ साली मांडली व १९५९ साली सहकारी औद्योगिक वसाहतींची संकल्पना मांडून त्याला पाठबळ दिले होते. म्हणुनच या औद्योगिक वसाहतींच्या विकासासाठी पालक म्हणून चेंबर कार्यरत असल्याचे सांगितले.

सहकारी औद्योगिक वसाहत फेडरेशन चे अध्यक्ष सचिन पाटील यांनी आपल्या भाषणात फेडरेशनच्या कार्याचा आढावा घेतला व महाराष्ट्र चेंबर ने घेतलेल्या पुढाकाराबद्दल धन्यवाद दिले. फेडरेशनचे नामकर्ण आवारे, रमेश आरवाडे, विलास लोखंडे यांनीही मनोगते व्यक्त केली. यावेळी महाराष्ट्र चेंबर तर्फे खाजगी इंडस्ट्रीअल पार्क मधील पायाभुत सुविधांसाठी अनुदान देण्याची मागणी मान्य करून उद्योगमंत्री उदय सामंत यांनी खाजगी इंड. पार्क साठी ५० टक्के अनुदान देण्याची घोषणा केल्याबद्दल ललित गांधी यांनी विशेष धन्यवाद दिले.








◆ 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' च्या शतकमहोत्सवाच्या औचित्याने आयोजित केलेल्या सहकारी, शासकीय औद्योगिक वसाहत राज्यस्तरीय परिषद प्रसंगी केंद्रीय गृह व सहकार मंत्री नाम. अमित शाह व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत करताना ललित गांधी





◆ कार्यक्रमाप्रसंगी प्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत करताना उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, केंद्रीय सहकार व नागरी उड्डयण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत करताना उपाध्यक्ष संजय सोनवणे व प्रफुल्ल मालाणी, महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत करताना उपाध्यक्ष शंकर शिंदे







◆ कार्यक्रमाप्रसंगी प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत करताना उपाध्यक्ष सौ. संगिता पाटील व श्रीकृष्ण परब, महाराष्ट्र राज्याचे कौशल्य व रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत करताना उपाध्यक्ष रमाकांत मालु व निमंत्रित सदस्य विजय बेदमुथा, महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत करताना उपाध्यक्ष दिलीप गुप्ता व निमंत्रित सदस्य कांतीलाल चोपडा




◆ केंद्रीय गृह व सहकार मंत्री नाम. अमित शाह यांना 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' द्वारा आयोजित शताब्दी महोत्सवाचे स्मृतिचिन्ह देताना अध्यक्ष ललित गांधी सोबत मंचावर उपस्थित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ,विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उद्योगमंत्री उदय सामंत.



◆ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शताब्दी महोत्सवाचे स्मृतिचिन्ह देताना वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे



◆ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शताब्दी महोत्सवाचे स्मृतिचिन्ह देताना उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी



◆ केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांना शताब्दी महोत्सवाचे स्मृतिचिन्ह देताना उपाध्यक्ष संजय सोनवणे व प्रफुल्ल मालाणी



◆ विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना शताब्दी महोत्सवाचे स्मृतिचिन्ह देताना उपाध्यक्ष शंकर शिंदे, आशिष पेडणेकर








◆ उद्योग मंत्री उदय सामंत यांना शताब्दी महोत्सवाचे स्मृतिचिन्ह देताना उपाध्यक्ष सौ. संगिता पाटील व श्रीकृष्ण परब, कौशल्य व रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा यांना शताब्दी महोत्सवाचे स्मृतिचिन्ह देताना उपाध्यक्ष दिलीप गुप्ता व निमंत्रित सदस्य कांतीलाल चोपडा, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांना शताब्दी महोत्सवाचे स्मृतिचिन्ह देताना उपाध्यक्ष रमाकांत मालु व निमंत्रित सदस्य विजय बेदमुथा




◆ महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर ची अध्यक्षीय ट्रॉफी ललित गांधी यांना प्रदान करताना केंद्रीय गृहमंत्री नाम. अमित शाह सोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर,उद्योगमंत्री उदय सामंत, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा

# महाराष्ट्र चेंबरच्या अध्यक्षपदी ललित गांधी यांची सलग चौथ्यांदा बिनविरोध फेरनिवड

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते पदभार प्रदान

**मुंबई** : महाराष्ट्रातील उद्योग, व्यापार, कृषि उद्योग क्षेत्राची शिखर संस्था म्हणून कार्य करणार्या 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' च्या अध्यक्षपदी ललित गांधी यांची सलग चौथ्यांदा बिनविरोध फेरनिवड झाली असुन केंद्रीय गृह व सहकारीता मंत्री नाम. अमित शाह यांच्या हस्ते त्यांना प्रेसीडेन्शीअल कप प्रदान करून अध्यक्षपदाचा कार्यभार प्रदान करण्यात आला.

शतकमहोत्सव समारोह सुरू झालेल्या वर्षात अध्यक्षपदाची जबाबदारी मिळण्याचा गौरव प्राप्त करण्यार्या ललित गांधी यांच्या पदभार प्रदान प्रसंगी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ,विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर,उद्योगमंत्री उदय सामंत, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासह विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केंद्रीय गृहमंत्री नाम. अमित शाह यांनी मार्गदर्शन करताना ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या माध्यमातुन येत्या शंभर वर्षासाठीचे नियोजन करावे व व्यावसायिक कार्यपध्दतीचा अवलंब करावा असे सांगुन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या शंभर वर्षांची गौरवशाली परंपरा व अनुभवाची शक्ति ही येणार्या काळातील विकासासाठी महत्वाची ठरणार असल्याचे सांगितले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नाम. देवेंद्रजी फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर संस्थेने उद्योग, व्यापार आणि शेतीच्या क्षेत्रात नवे उद्यमी तयार करण्याची मुहूर्तमेढ रोवली. देशात अनेक चेंबर ऑफ कॉमर्स/इंडस्ट्री नाव असलेल्या संस्था आहेत. पण कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर असे एकत्रित नाव असलेली ही एकमेव संस्था असून, याच संस्थेच्या माध्यमातून 'फिक्की'सारख्या संस्थेची निर्मिती झाली. अशा प्रकारे उद्योग व व्यापाराचे भारतीयीकरण करण्याच्या हेतूने १०० वर्षांपूर्वी सुरू झालेली ही संस्था आज अतिशय गौरवाने उभी आहे, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संस्थेचे अभिनंदन केले व भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र चेंबरचे संचालक मंडळातील सदस्य बी.जी.खेर हे स्वातंत्र्यानंतरचे या राज्याचे पहिले मुख्यमंत्री झाले यावरून महाराष्ट्र चेंबरचा प्रभाव लक्षात येऊ शकतो असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवर्जून नमूद केले.




पुढे ते म्हणाले, आज शेठ वालचंद हिराचंदजी यांचे स्मरण अतिशय महत्त्वाचे आहे, कारण देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या भूमिपुत्रांपैकी ते एक आहेत. त्यांनी या संस्थेची निर्मिती केली व हजारो लोकांना प्रेरणा दिली. शेठ वालचंदजी यांनी रोपटे लावलेल्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड अॅग्रीकल्चर या संस्थेचे आताचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वात या संस्थेसाठी १०० वे वर्ष ऐतिहासिक ठरेल, असा विश्वासही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्र चेंबरच्या वैभवशाली परंपरेचा गौरवपूर्ण उल्लेख करून चेंबरने विकासात केलेल्या सहभागाबद्दल चेंबरचे अभिनंदन केले. ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र चेंबरने महाराष्ट्राच्या उद्योग व्यापार क्षेत्राच्या विकासासाठी त्यांच्या कारकिर्दीत अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले असून त्यांच्या पुढील कारकिर्दीत दैदीप्यमान कामगिरी करून महाराष्ट्र चेंबर महाराष्ट्राच्या व देशाच्या विकासात सहभागी होईल असा विश्र्वास व्यक्त केला.

महाराष्ट्र चेंबरचे नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांनी चौथ्यांदा बिनविरोध निवड केल्याबद्दल सभासदांचे आभार मानले. देशातील कणखर नेतृत्व म्हणून परिचित असलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते पदभार स्वीकारणे या आयुष्यातील सर्वात गौरवपूर्ण घटना असल्याचे नमूद करून सर्व मान्यवरांनी व्यक्त केलेल्या अपेक्षा आगामी काळात पूर्ण करण्याचा प्रयत्न करू. महाराष्ट्राच्या उद्योग व्यापार क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी, या क्षेत्राचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्र चेंबरच्या माध्यमातून प्रभावी नेतृत्व करू अशी ग्वाही दिली.





◆ **महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रीकल्चर चे नवीन चीफ पॅट्रोन सदस्य घनश्याम गोयल व माजी अध्यक्ष व महाराष्ट्र ट्रस्ट बोर्ड चेअरमन आशिष पेडणेकर यांचा सत्कार करताना केंद्रीय गृहमंत्री नाम. अमित शाह सोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ,विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उद्योगमंत्री उदय सामंत, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा**

# नुतनीकृत मुख्यालय...
# सन्मान विभिन्न प्रायोजकांचा - ज्यांनी खुलवले अंतरंग...




◆ महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे नवीन चीफ पेट्रॉन भरत गांधी यांचा सत्कार करताना केंद्रीय गृहमंत्री नाम. अमित शाह

Lalit Gandhi Foundation
Charity Begins from Home!



**Lalit Gandhi Foundation Conference Hall**

The ***Lalit Gandhi Foundation*** is a progressive social organisation founded on the core values of compassion, service, and inclusive development. Established with a vision to contribute meaningfully to society, the foundation is actively engaged in initiatives that empower individuals through education and health-related services—the two most critical pillars of sustainable community growth.

Driven by the guiding belief that access to quality education and healthcare is a fundamental right, the Lalit Gandhi Foundation operates two dedicated institutes focused on delivering holistic and affordable services to underprivileged and marginalized sections of society. These institutes serve as beacons of hope for hundreds of families, offering a range of programs from basic education to essential medical care and health awareness.

In the field of education, the foundation emphasizes skill development, character-building, and knowledge-sharing that nurtures responsible, self-reliant citizens. Its educational initiatives aim to bridge the gap between potential and opportunity, especially in rural and semi-urban regions where quality educational infrastructure is often lacking.

On the healthcare front, the foundation conducts regular health camps, awareness drives, and access-oriented services for the needy. It remains committed to improving the health outcomes of communities by promoting preventive care, maternal and child health support, and affordable treatment options. Recent initiatives such as the ***Mobile Cancer Checkup Bus*** provide early screening and awareness for underserved populations, while the ***Free Ambulance Service*** for Patients ensures timely access to emergency care for economically weaker sections. Additionally, a ***Rescue Ambulance Service for Animals in Road Accidents*** reflects the foundation's inclusive approach to compassion and care, extending support not only to humans but also to voiceless beings in distress.

Under the visionary leadership and social commitment of its founder, Shri Lalit Gandhi, the foundation continues to grow in its mission, expanding partnerships, mobilizing volunteers, and building impactful programs that make a tangible difference in people's lives.

With a firm commitment to service before self, the Lalit Gandhi Foundation stands as a trusted institution in the social sector, working tirelessly toward a healthier, educated, and empowered society.



◆ महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे नवीन चीफ पेट्रॉन के. आर. वेदमुथा व अजय वेदमुथा यांचा सत्कार करताना केंद्रीय गृहमंत्री नाम. अमित शाह

BEDMUTHA GROUP



K. R. Bedmutha Auditorium & Skill Center



Kamalabai Bedmutha Conference Hall

## Bedmutha Industries Limited

**Corporate Overview :**

Incorporated: On 23rd August 1990
Headquarters: Sinnar, Maharashtra, India
Listed on: BSE/NSE (IPO launched in September 2010)

Bedmutha Industries Limited (BIL), a pioneering name in the Indian manufacturing sector, was incorporated in 1990 and commenced operations with the production of steel wires and allied products at its Sinnar facility in Maharashtra. Over the decades, the company has expanded its footprint by setting up or acquiring four manufacturing units in Sinnar, focusing on a wide range of steel-related products.

**Growth and Expansion :**

In September 2010, the company successfully launched its Initial Public Offering (IPO), marking a major milestone in its journey. The funds raised through the IPO, coupled with a term loan from a consortium of banks, facilitated BIL's strategic expansion into the production of specialized, value-added products at its state-of-the-art mega plant in Nardana, Dhule District, Maharashtra. Operations at Nardana began in November 2013 and represent a major leap in scale and sophistication for the company.

**Manufacturing Capacities & Product Range :**

Steel Products Capacity: 7,200 MT/Month
Copper Products Capacity: 1,350 MT/Month
Major Products Include:

**Steel Segment :**

- Steel Wires
- Wire Ropes
- Wire Rods
- Tyre Bead Wire

- **Copper Segment**
- Copper Rods
- Bus Bars
- Foils
- Wires
- RBD
- BUN
- PVC Wires

Additionally, BIL is actively engaged in EPC projects for power transmission and distribution, strengthening its presence in the infrastructure segment.

**Leadership Team**

Founder & Chairman Emeritus

**Mr. Kachardas Ratanchand Bedmutha**

A qualified engineer with professional experience in the Birla Group, Heavy Engineering Corporation, and Indian Tools. Under his visionary leadership, BIL evolved from a single-product entity to a diversified multi-product company.

**Key Management :**

- **Mr. Vijay Kachardas Vedmutha**
  Chairman & Managing Director
- **Mr. Ajay Kachardas Vedmutha**
  Managing Director & CFO
- **Mrs. Vinita Ajay Vedmutha** – Senior CEO
- **Mr. Kachardas Ratanchand Bedmutha**
  Whole-Time Director

**Independent Directors :**

- Mr. Shreekrishna Yashvantrao Marathe
- Ms. Tilottama Rajaram Deshpande
- Mr. Sanjaya Kandpal

Group Companies / Sister Concerns

Bedmutha Industries Limited is part of a diversified business group with interests spanning engineering, infrastructure, real estate, and innovation-driven ventures.

**Core Values :**

- *Quality First – Excellence in every product*
- *Customer Centricity – Delivering value with trust*
- *Sustainable Growth – Building for future generations*
- *Innovation – Driving advancement in every vertical*




DHARTiDHAN GROUP



◆ महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे नवीन चीफ पॅट्रोन सौ. मनिषा चोपडा यांचा सत्कार करताना केंद्रीय गृहमंत्री नाम. अमित शाह

**Kantilal Chopda Meeting Hall**

# Dhartidhan Group

• Surashtra Estates Private Limited (2012) • Nashik Estates Private Limited (2010)
• Dhartidhan Estates Private Limited (1997)

**Founder Chairman Kantilal Shantilal Chopda**

A Trusted Name in Real Estate Development Surashtra Estates Private Limited is a forward-looking real estate firm with a focus on delivering value-driven projects across Maharashtra and beyond. Built on a foundation of trust, transparency, and regional expertise, the company specializes in residential layouts, investmentready plots, and well-planned developments that cater to modern living while staying rooted in local culture. With a strong understanding of market trends and customer needs, Surashtra Estates is unlocking land potential for sustainable growth.

Nashik Estates Private Limited is a dynamic real estate development company committed to reshaping the urban fabric of Nashik and surrounding regions. Known for its customer-first approach, the company blends thoughtful design, robust construction, and ethical business practices to deliver homes and spaces that stand the test of time. From serene residential plots to vibrant communities, Nashik Estates is helping build the city's future.

Dhartidhan Estates Private Limited, founded in 1997, stands as a trusted name in real estate, creating thoughtfully designed spaces that blend utility, elegance, and long-term value. With a growing portfolio that includes row houses, residential layouts, and boutique commercial developments, the company is driven by quality, timely delivery, and a deep commitment to customer satisfaction. Dhartidhan Estates builds more than structures — it builds lasting relationships and vibrant communities.

**Key Highlights :**

- Strong presence across key urban and suburban markets
- Residential & commercial real estate projects
- Focus on sustainable construction and eco-friendly planning
- Emphasis on quality materials and smart layouts

**Our Project Expertise :**

- Premium Row Houses
- Residential Layouts & Gated Communities
- Urban Redevelopment Projects

Our companies don't just build properties — we craft communities, nurture lifestyles, and lay the groundwork for futures filled with promise. With a strong foundation and a forward-looking approach, we are building not just homes but also a legacy.




◆ महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे नवीन चीफ पेट्रॉन सतीश पारख यांचा सत्कार करताना केंद्रीय गृहमंत्री नाम. अमित शाह



Ashoka Darbar Hall

# ASHOKA BUILDCON LIMITED

*Engineering Excellence. Global Footprint.*

A Fortune India 500 Company | Listed on NSE & BSE

Ashoka Buildcon Limited stands tall among India's premier infrastructure companies. With its origins rooted in 1976, the company has grown from a modest contracting firm into a formidable integrated player in EPC (Engineering, Procurement, Construction), BOT (Build, Operate, Transfer), and HAM (Hybrid Annuity Model).

Driven by an unwavering commitment to quality, safety, environmental consciousness, and timely delivery, Ashoka Buildcon has established a legacy of excellence in infrastructure development. The company's portfolio is adorned by several record setting projects.



**Key Highlights :**

- Presence in 22 States across India
- Operations in 7 Countries across 3 Continents
- Listed on NSE & BSE
- Strong technical & professional workforce

Known for speed, quality and sustainability

- Diverse Project Portfolio
- Highways & Expressways
- Bridges & Railways
- Power Transmission & Solar Projects
- Smart Infrastructure & Water Management
- City Gas Distribution
- Public Buildings
- Airports

At Ashoka Buildcon, we take pride in pushing boundaries and redefining what's possible in infrastructure. Our projects reflect innovation, reliability, and the spirit of nation-building — both in India and across the globe.

## मान. नाम. अमितभाई शाह

**केंद्रीय गृह व सहकार मंत्री,**
**भारत सरकार**




आज के इस अत्यंत महत्वपूर्ण कार्यक्रम में मेरे साथ मंच पर उपस्थित मेरे मित्र एवं महाराष्ट्र के माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस जी, महाराष्ट्र के उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे जी–जिन्होंने यह स्पष्ट कर दिया कि असली शिवसेना कौन है–मेरे सहयोगी मंत्री श्री मुरलीधर मोहोळ जी, महाराष्ट्र विधान सभा के अध्यक्ष श्री राहुल नार्वेकर जी, उद्योग मंत्री श्री उदय सामंत जी, सांस्कृतिक मंत्री श्री आशीष शेलार जी, कौशल विकास एवं रोजगार मंत्री श्री मंगलप्रभात लोढ़ा जी, जिन्होने मुझे इस समारोह के लिए आमंत्रित किया, कार्यक्रम के आयोजक एवं आज के समारोह के अध्यक्ष श्री ललित गांधी जी तथा उनकी समर्पित टीम को मैं हार्दिक शुभकामनाएं और बधाई देता हूं।

मित्रों, जब ललित जी ने मुझे आमंत्रित किया और मेरे कार्यालय ने जब संस्था का परिचय माँगा, तब मुझे यह ज्ञात हुआ कि यह संस्था शेठ वालचंद जी द्वारा स्थापित की गई है। यह जानकर बिना किसी संकोच के मैंने यहाँ आने के लिए सहमति दे दी। क्योंकि शेठ वालचंद जी ने जिस भी कार्य की नींव रखी, वह उस क्षेत्र में अग्रणी सिद्ध हुई। वे केवल एक उद्योगपति नहीं थे, बल्कि एक दूरदर्शी राष्ट्रनिर्माता भी थे।

शेठ वालचंद जी ऐसे उद्यमी थे जिन्होंने अपनी कंपनी के विकास के साथ–साथ यह भी देखा कि देश को किस चीज़ की ज़रूरत है।

उन्हें देश की प्रथम स्वदेशी कार निर्माण का गौरव प्राप्त हुआ। उन्होंने स्वदेशी विमान निर्माण की जो पहल की, वही आगे चलकर हिंदुस्तान एयरोनॉटिक्स लिमिटेड बनी।

भारत की पहली शिपिंग कंपनी – सिंधिया स्टीम नेविगेशन – भी उन्होंने ही स्थापित की। और देश का पहला स्वदेशी जहाज़ निर्माण कारखाना भी उन्होंने ही शुरू किया।

आज आप सभी 'महाराष्ट्र महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री और ॲग्रीकल्चर' के शताब्दी वर्ष का उत्सव मना रहे है। उस समय अंग्रेजों की व्यवस्था के विरुद्ध काम करने के लिए यह संस्था बनाई गई थी।

जब कोई दूरदर्शी व्यक्ति किसी संस्था की नींव रखता है और उसका उद्देश्य केवल निजी स्वार्थ नहीं होता, बल्कि समाज और राष्ट्र के प्रति समर्पित होता है – तब उसे ईश्वर का आशीर्वाद भी अवश्य मिलता है।

कोई संस्था १०० वर्षों तक निरंतर सक्रिय रहे, यह स्वयं में गौरव का विषय है। यह न केवल संस्था की सफलता का प्रमाण है, बल्कि समाज की सेवा का भी प्रतीक है।

देश भर में कई महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स कार्यरत हैं, लेकिन कोई भी संस्था लंबे समय तक एक ही व्यक्ति के नेतृत्व में नहीं रहती – और रहनी भी नहीं चाहिए।

बदलते नेतृत्व के साथ भी यदि संस्था अपनी प्रासंगिकता बनाए रखती है, उपयोगिता बढ़ाती है और निरंतर योगदान देती रहती है – तो यह बहुत कम संस्थाओं के लिए संभव होता है।

इसलिए मैं 'महाराष्ट्र महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री और ॲग्रीकल्चर' को हार्दिक शुभकामनाएं और साधुवाद देता हूँ।

जब कोई संस्था १०० वर्ष पूरे करती है, तो वह केवल गौरव का क्षण नहीं होता – वह आत्मचिंतन का भी अवसर होता है।

पिछले सौ वर्षों में हमारे देश के उद्योग, वाणिज्य और कृषि – तीनों क्षेत्रों में क्रांतिकारी परिवर्तन हुए हैं।

राज्य और केंद्र सरकारों की शासन प्रणालियों में भी आमूलचूल बदलाव आए है। नीति–निर्माण की प्रक्रियाएं भी पूरी तरह से बदल चुकी हैं।

एक समय था जब महाराष्ट्र चेंबर को केवल देश के भीतर के व्यापार या अधिक से अधिक एक–दो देशों के साथ व्यापार पर चर्चा करनी होती थी।

लेकिन आज की अर्थव्यवस्था वैश्विक हो चुकी है। यदि युद्ध ईरान और इज़राइल के बीच हो, तो उसका असर भारत की अर्थव्यवस्था पर भी पड़ता है।

ऐसे समय में, देश भर के सभी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री और ॲग्रीकल्चर को आत्मचिंतन करना चाहिए।

हमें पेशेवर संस्थाओं से अध्ययन कराकर यह मूल्यांकन करना चाहिए कि जिस प्रकार देश की अर्थव्यवस्था, नीतियां और संसदीय प्रक्रियाएं बदली हैं, उसी तरह हमारी कार्यप्रणाली और प्राथमिकताएं भी समयानुसार बदलनी चाहिए।

मेरी ललित जी से विनम्र प्रार्थना है – अब जबकि आप अध्यक्ष बन चुके हैं, तो यह महत्वपूर्ण ज़िम्मेदारी आपके कंधों पर है।

मित्रों, आज मैं आपके नए मुख्यालय का उद्घाटन किया है । इस अवसर पर मैं महाराष्ट्र चेंबर से जुड़ी सभी संस्थाओं, सदस्यों और इस पूरे संगठन को बहुत–बहुत शुभकामनाएं देता हूँ।

मेरी कामना है कि आने वाले सौ वर्षों में भी आपका योगदान इसी प्रकार बढ़ता रहे और देश के विकास में आपका मार्गदर्शन बना रहे।

जब १९२७ में देश पराधीन था, तब इस महाराष्ट्र चेंबर की स्थापना हुई। उस समय हम अपने निर्णय स्वयं नहीं ले सकते थे – हमें दूसरे देश की संसद द्वारा बनाए गए कानूनों पर निर्भर रहना पड़ता था।

और आज, जब यह संस्था अपना शताब्दी वर्ष मना रही है, तब भारत दुनिया की चौथी सबसे बड़ी अर्थव्यवस्था बन चुका है।

और अब हम तीसरे स्थान की ओर तेज़ी से अग्रसर है। हमने उन लोगों को भी पीछे छोड़ दिया है, जिन्होंने दो सौ वर्षों तक हम पर शासन किया।

इस पूरी परिवर्तन यात्रा के आप सभी साक्षी रहे हैं।

आपको फिक्की (FICCI) के संस्थापक सदस्य के रूप में भी याद किया जाता है।

मैंने ध्यान से पढ़ा है – महाराष्ट्र के विकास से जुड़ी हर पहल में महाराष्ट्र चेंबर की भूमिका रही है। किसी को पत्र लिखा गया, किसी नीति की मांग की गई – और आज मुझे भी एक पत्र मिला है।

बेशक निर्णय कोई भी करे, लेकिन जब महाराष्ट्र चेंबर ने कोंकण रेलवे की मांग उठाई, तो वह उस समय असंभव–सा कार्य लगता था।

आज वह परियोजना पूरी हो चुकी है और महाराष्ट्र के विकास में उसका योगदान अमूल्य है।

यही भूमिका महाराष्ट्र चेंबर की होनी चाहिए – भविष्य की ज़रूरतों को पहचानना, सरकार के समक्ष नीति और ढांचे की माँग करना, और इन्फ्रास्ट्रक्चर विकास की दिशा में मार्गदर्शन देना।

साथ ही यह भी ज़रूरी है कि महाराष्ट्र चेंबर व्यापार, उद्योग और कृषि से जुड़ी समस्याओं को शासन को भली–भांति समझाता रहे।

मुझे विश्वास है कि आप सभी ने यह कार्य बीते सौ वर्षों में बखूबी किया है।

मित्रों, हाल ही में मोदी जी की सरकार के ११ वर्ष पूरे हुए हैं, और इन वर्षों में देश में अभूतपूर्व परिवर्तन देखने को मिला है।

जब २०१४ में मोदी जी के नेतृत्व में सरकार बनी थी, तब भारत दुनिया की ११वीं सबसे बड़ी अर्थव्यवस्था था।

आज हम चौथे स्थान पर है।

और मैं आपको विश्वास दिलाता हूं – २०२७ से पहले भारत तीसरी सबसे बड़ी अर्थव्यवस्था बन जाएगा।

इन ११ वर्षों में डिजिटल लेन–देन, स्टार्टअप्स, एविएशन सेक्टर, इन्फ्रास्ट्रक्चर – हर क्षेत्र में क्रांतिकारी कार्य हुए हैं।

यदि मैं हर उपलब्धि की चर्चा करूं, तो २५ से भी अधिक बिंदु गिनाने पड़ेंगे, और शायद ७ दिन का भागवत–सप्ताह बैठाना पड़ेगा!

मगर आज मैं खास तौर पर महाराष्ट्र की बात करना चाहता हूं। स्वतंत्रता के समय से ही महाराष्ट्र में अपार संभावनाएं रही हैं।

यह राज्य देश के औद्योगिक विकास का परिचायक बना रहा है, और वर्षों तक महाराष्ट्र ने देश का औद्योगिक नेतृत्व किया है।

मुंबई नगरी को देश की आर्थिक राजधानी का गौरव प्राप्त है – क्योंकि यहाँ स्टॉक मार्केट, रिजर्व बैंक ऑफ इंडिया, और प्रमुख वित्तीय संस्थानों के मुख्यालय स्थित है।

महाराष्ट्र ने हमेशा देश की अर्थव्यवस्था को सशक्त करने में कोई कसर नहीं छोड़ी।

हालाँकि, बीच में एक ऐसा कालखंड भी आया जिसमें थोड़ी रुकावटें आईं, मगर अब जब देवेंद्र फडणवीस जी और एकनाथ शिंदे जी के नेतृत्व में सरकार चल रही है, तब महाराष्ट्र को नई ऊर्जा, नई दृष्टि, और दूरदर्शिता के साथ फिर से आगे बढ़ाया गया है। आज भारत की सबसे बड़ी राज्य अर्थव्यवस्था महाराष्ट्र की है। विदेशी निवेश (FDI) सबसे अधिक महाराष्ट्र में आता है।

और आने वाले समय में, यह राज्य देश को एक नई औद्योगिक ऊंचाई पर ले जाने में महत्वपूर्ण भूमिका निभाएगा।

अंत में, मैं फिर से महाराष्ट्र महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री और ॲग्रीकल्चर को उनके शताब्दी वर्ष के इस गौरवपूर्ण अवसर पर हार्दिक शुभकामनाएं देता हूँ।

आप सभी देश के निर्माण में पहले भी भागीदार रहे हैं और आगे भी प्रेरक शक्ति बने रहेंगे।

**धन्यवाद।**

# प्रेरणादायी उद्बोधन...

## मान. नाम. अमितभाई शाह

**केंद्रीय गृह व सहकार मंत्री,**
**भारत सरकार**




आजच्या या अत्यंत महत्त्वाच्या कार्यक्रमात माझ्यासोबत मंचावर उपस्थित माझे मित्र आणि महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीसजी, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदेजी – ज्यांनी हे स्पष्ट केलं की खरी शिवसेना कोणती आहे – माझे सहकारी मंत्री श्री मुरलीधर मोहोळजी, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष श्री राहुल नार्वेकरजी, उद्योगमंत्री श्री उदय सामंतजी, सांस्कृतिक कार्यमंत्री श्री आशीष शेलारजी, कौशल्य विकास आणि रोजगार मंत्री श्री मंगलप्रभात लोढाजी, **ज्यांनी मला या समारंभासाठी आमंत्रण दिलं ते कार्यक्रमाचे आयोजक आणि आजच्या समारंभाचे अध्यक्ष श्री ललित गांधीजी आणि त्यांच्या समर्पित टीमला मी मनःपूर्वक शुभेच्छा देतो आणि अभिनंदन करतो.**

मित्रांनो, जेव्हा ललितजींनी मला आमंत्रित केलं आणि माझ्या कार्यालयाने संस्थेची माहिती मागितली, तेव्हा समजलं की ही संस्था शेठ वालचंदजींनी स्थापन केली होती. हे समजताच मी कोणतीही शंका न बाळगता येथे येण्यास तत्काळ संमती दिली. कारण शेठ वालचंदजींनी ज्या ज्या क्षेत्रात पाय ठेवला, तिथे त्यांनी क्रांतिकारी पुढाकार घेतला.

ते केवळ उद्योजक नव्हते, तर दूरदृष्टी असलेले राष्ट्रनिर्माते होते. त्यांनी केवळ आपल्या कंपनीचा विकास केला नाही, तर देशाला काय गरज आहे हेही पाहिलं.

देशातली पहिली स्वदेशी कार बनवण्याचा गौरव त्यांना मिळाला. त्यांनी सुरू केलेली स्वदेशी विमाननिर्मिती पुढे जाऊन हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (HAL) बनली.

भारतातील पहिली शिपिंग कंपनी – सिंधिया स्टीम नेव्हिगेशन – त्यांनी स्थापन केली. देशातील पहिलं स्वदेशी जहाजबांधणी कारखानाही त्यांनीच सुरू केला.

आज तुम्ही सर्वजण 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री आणि ॲग्रीकल्चर' च्या शताब्दी वर्षाचा उत्सव साजरा करत आहात. हे संस्थेचं मूळ उद्दिष्ट तेव्हा ब्रिटिश व्यवस्थेविरुद्ध काम करणं हे होतं.

जेव्हा एखादा दूरदृष्टीचा नेता एखाद्या संस्थेची स्थापना करतो आणि त्याचा उद्देश केवळ वैयक्तिक नाही, तर समाज आणि राष्ट्राच्या सेवेसाठी असतो – तेव्हा त्या कार्याला नक्कीच दैवी आशीर्वाद लाभतो.

एखादी संस्था १०० वर्षे सतत कार्यरत राहणे ही स्वतःमध्येच गौरवाची बाब आहे. ही संस्था केवळ यशाचं प्रतीक नाही, तर समाजसेवेचंही प्रतीक आहे.

देशभरात अनेक महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स आहेत, पण कोणतीही संस्था एका नेतृत्वाखाली दीर्घकाळ राहत नाही आणि राहूही नये.

पण जर नेतृत्व बदलत असतानाही एखादी संस्था आपली उपयुक्तता टिकवून ठेवते, योगदान देत राहते – तर हे फार थोड्या संस्थांना शक्य होतं.

त्यामुळे मी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री आणि ॲग्रीकल्चर' ला मनःपूर्वक शुभेच्छा आणि धन्यवाद देतो.

कोणतीही संस्था १०० वर्ष पूर्ण करते, तेव्हा तो केवळ अभिमानाचा क्षण नसतो – तर आत्मपरीक्षणाचा ही क्षण असतो.

गेल्या शंभर वर्षांत आपला उद्योग, वाणिज्य आणि शेती या तिन्ही क्षेत्रांत क्रांतिकारी बदल झाले आहेत.

राज्य आणि केंद्र सरकारांच्या कार्यपद्धतींतही आमूलाग्र बदल झाले आहेत. धोरणनिर्मितीची प्रक्रिया देखील पूर्णपणे बदलली आहे.

पूर्वी महाराष्ट्र चेंबरला केवळ देशांतर्गत व्यापार किंवा फारतर १-२ देशांशी व्यापारावर चर्चा करावी लागत असे.

आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेत जर इराण आणि इस्रायलमध्ये युद्ध होत असेल, तर त्याचा परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होतो.

अशा वेळी, सर्व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री आणि ॲग्रीकल्चर संस्थांनी आत्मपरीक्षण करावं हवं.

आपल्या कार्यपद्धती, प्राधान्यक्रम बदलणं गरजेचं आहे जे आजच्या धोरण, अर्थव्यवस्था आणि संसदीय प्रक्रियेनुसार सुसंगत असेल.

माझी ललितजींना नम्र विनंती आहे – अध्यक्ष झाल्यानंतर ही जबाबदारी आता तुमच्यावर आहे.

मित्रांनो, आज मी तुमच्या नवीन मुख्यालयाचं उद्घाटन केलं आहे. या प्रसंगी मी सर्व सदस्यांना आणि संस्थेला मनापासून शुभेच्छा देतो.

माझी इच्छा आहे की पुढील १०० वर्षेही हे योगदान असेच सुरू राहील आणि देशाच्या विकासात आपला मार्गदर्शन मिळत राहील.

१९२७ मध्ये देश स्वतंत्र नव्हता, तेव्हा ही संस्था स्थापन झाली. तेव्हा आपण स्वतः निर्णय घेऊ शकत नव्हतो – आपल्याला ब्रिटिश संसदेनं बनवलेल्या कायद्यांवर अवलंबून राहावं लागत होतं.

आणि आज, जेव्हा ही संस्था आपलं शताब्दी वर्ष साजरं करत आहे, तेव्हा भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनलेला आहे.

आणि आता आपण वेगाने तिसऱ्या क्रमांकाकडे जात आहोत. आपण त्यांनाही मागे टाकलं आहे, ज्यांनी दोनशे वर्षे आपल्यावर राज्य केलं.

या संपूर्ण परिवर्तनाच्या प्रवासाचे तुम्ही साक्षीदार आहात.

तुम्हाला FICCI च्या संस्थापक सदस्य म्हणूनही ओळखलं जातं.

मी अभ्यासपूर्वक पाहिलं आहे – महाराष्ट्राच्या प्रत्येक विकासाशी संबंधित उपक्रमात महाराष्ट्र चेंबरचं महत्त्वाचं योगदान राहिलं आहे. कुठे पत्र पाठवलेलं, कुठे एखाद्या धोरणाची मागणी केलेली – आणि आज मलाही एक पत्र मिळालं आहे.

निर्णय कुणीही घेऊ दे, पण जेव्हा महाराष्ट्र चेंबरने कोकण रेल्वेची मागणी केली होती, तेव्हा तो एक अशक्य वाटणारा निर्णय होता.

आज ती योजना पूर्ण झाली आहे आणि महाराष्ट्राच्या विकासात तिचं मोलाचं योगदान आहे.

हीच भूमिका महाराष्ट्र चेंबरची असावी – भविष्यातील गरज ओळखणं, शासनासमोर धोरण आणि ढाच्यांची मागणी करणं, आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी दिशादर्शन करणं.

महाराष्ट्र चेंबरनं व्यापार, उद्योग आणि शेतीशी संबंधित अडचणी शासनाला समजावून सांगण्याचं काम गेली १०० वर्षे उत्तम प्रकारे केलं आहे, असा मला विश्वास आहे.

मित्रांनो,

अलीकडेच मोदी सरकारच्या ११ वर्षांची पूर्णता झाली आहे. या ११ वर्षांमध्ये देशात अभूतपूर्व परिवर्तन घडलं आहे.

२०१४ मध्ये जेव्हा मोदीजींच्या नेतृत्वाखाली सरकार बनलं, तेव्हा भारत जगातील ११व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होता. आज आपण चौथ्या क्रमांकावर पोहोचलो आहोत.

आणि मी तुम्हाला विश्वासाने सांगतो – २०२७ पूर्वी भारत तिसऱ्या क्रमांकावर पोहोचेल.

या ११ वर्षांत डिजिटल व्यवहार, स्टार्टअप्स, विमान क्षेत्र, इन्फ्रास्ट्रक्चर – प्रत्येक क्षेत्रात क्रांतिकारी काम झालं आहे.

जर मी प्रत्येक उपलब्धीबद्दल बोलायला लागलो, तर २५ पेक्षा जास्त मुद्दे सांगावे लागतील, आणि कदाचित ७ दिवसांचं भागवत सप्ताह भरवावं लागेल !

पण आज मी विशेषतः महाराष्ट्राबद्दल बोलू इच्छितो.

स्वातंत्र्याच्या वेळेपासूनच महाराष्ट्रात अपार संधी होत्या.

हे राज्य देशाच्या औद्योगिक विकासाचं प्रतिनिधित्व करत आलं आहे, आणि अनेक वर्षे महाराष्ट्राने औद्योगिक नेतृत्व केलं आहे.

मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाते – कारण येथे स्टॉक मार्केट, रिझर्व बँक आणि प्रमुख आर्थिक संस्थांचं मुख्यालय आहे.

महाराष्ट्राने देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी नेहमीच महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

मधल्या काळात थोडी अडचण आली होती

पण आता जेव्हा देवेंद्र फडणवीसजी आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकार कार्यरत आहे,

तेव्हा महाराष्ट्र नव्या उर्जेसह, नव्या दृष्टिकोनासह पुढे जात आहे.

आज भारतातली सर्वात मोठी राज्य अर्थव्यवस्था महाराष्ट्राची आहे.

FDI (थेट विदेशी गुंतवणूक) सर्वाधिक महाराष्ट्रात येतो.

आणि येत्या काळात हे राज्य देशाला एका नव्या औद्योगिक उंचीवर नेण्यात मोलाची भूमिका निभावेल.

शेवटी, मी पुन्हा एकदा 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री आणि ॲग्रीकल्चर' ला त्यांच्या शताब्दी वर्षाच्या या गौरवपूर्ण प्रसंगी हार्दिक शुभेच्छा देतो.

आपण सर्वजण देशनिर्मितीत आधीही भागीदार होतात आणि पुढेही प्रेरणादायी शक्ती राहाल.

**धन्यवाद !**




## Hon'ble Shri. Amitbhai Shah

Home Affairs & Co-operation Minister Govt. of India

In today's extremely important event, I extend my heartfelt greetings and congratulations to my friend and the Hon'ble Chief Minister of Maharashtra Shri Devendra Fadnavis ji, Deputy Chief Minister Shri Eknath Shinde ji—who has clearly established which is the real Shiv Sena—my colleague Minister Shri Murlidhar Mohol ji, Speaker of the Maharashtra Legislative Assembly Shri Rahul Narwekar ji, Industries Minister Shri Uday Samant ji, Culture Minister Shri Ashish Shelar ji, Skill Development and Employment Minister Shri Mangalprabhat Lodha ji—who invited me for this function—the event organizer and today's chairman Shri Lalit Gandhi ji and his dedicated team.

Prada is looking to collaborate with artisanal footwear makers in India, the company said on Friday, two weeks after the Italian luxury group sparked controversy by debuting ethnic sandals resembling 12th-century Indian styles.




After runway images from Milan went viral, Prada drew sharp criticism from Indian artisans who handcraft Kolhapuri sandals—named after the historic city of Kolhapur in Maharashtra. In response to the backlash, the brand acknowledged late last month that its open-toe design was directly inspired by traditional Indian footwear.

The controversy drove interest in Kolhapuri sandals, with artisans and sellers viewing the attention as an opportunity to promote the heritage craft and tap into a wave of nationalist pride.

In a statement to Reuters, Prada said it held virtual talks on Friday with the Maharashtra Chamber of Commerce, which represents 3,000 Kolhapuri sandal artisans, to explore potential opportunities for collaboration.

"The next step will be for Prada's supply chain team to meet a range of artisanal footwear manufacturers," the company said.

According to the Maharashtra Chamber of Commerce, Lorenzo Bertelli—son of Prada's owners and head of its corporate social responsibility—took part in the discussions.

During the talks, Prada reportedly expressed its intention to launch a limited-edition "Made in India" Kolhapuri-inspired sandal collection in partnership with Indian artisans.

India's luxury market remains relatively small but is growing steadily, with wealthy consumers investing in designer fashion, high-end cars and luxury timepieces.

Prada does not operate any retail stores in India, and its products are generally available only to affluent consumers who shop overseas.

# प्राडा ग्रुप महाराष्ट्र भेटीवर येणार : ललित गांधी

## ‘मेक इन इंडिया’ मोहिमेसाठी प्राडा ग्रुपची महाराष्ट्रातील हस्तकला क्षेत्राशी भागीदारी




◆ **अध्यक्ष ललित गांधी प्राडा ग्रुपबरोबर व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये संबोधित करताना, सोबत महाराष्ट्र चेंबर, कोल्हापुरी चप्पल उत्पादक, पदाधिकारी**

**मुंबई** : महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर (MCCI) आणि आंतरराष्ट्रीय लक्झरी फॅशन ब्रँड प्राडा ग्रुप यांच्यात एक उच्चस्तरीय ऑनलाईन बैठक यशस्वीरित्या पार पडली. या बैठकीचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र चेंबर अध्यक्ष ललित गांधी यांनी भूषवले. बैठकीचा मुख्य उद्देश सांस्कृतिक ओळख, नैतिक सोर्सिंग (ethical sourcing), आणि महाराष्ट्रातील पारंपरिक कारागीर समुदाय – विशेषतः कोल्हापुरी चप्पल उद्योग – यांच्याशी थेट सहकार्य साधण्यावर केंद्रित होता. हेच कोल्हापुरी चप्पल प्राडाच्या २०२६ च्या उन्हाळी प्रदर्शनात समाविष्ट करण्यात आले होते.

या बैठकीत प्राडा ग्रुप मिलान कडूनपुढील वरिष्ठ पदाधिकारी सहभागी होते श्री. लोरेन्झो बर्टेली – कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी प्रमुख, श्री. ख्रिस्तोफर बग – ग्लोबल कम्युनिकेशन्स डायरेक्टर, श्री. रोबर्टो मास्सार्डी – चीफ बिझनेस डेव्हलपमेंट ऑफिसर, श्रीमती फ्रांसेस्का सेकंदारी, श्रीमती वॅलेंटिना इस्मे पिकाटो.

महाराष्ट्र चेंबर ने या चर्चेत सांस्कृतिक आदर, सह–ब्रँडेड विकास, आणि फेअर ट्रेड (न्याय्य व्यापार) या तत्त्वांवर आधारित सहा मुद्दे मांडले. प्राडा ग्रुपने सर्व मुद्द्यांवर सकारात्मक प्रतिसाद दिला आणि महाराष्ट्रातील पारंपरिक कारीगरांशी दीर्घकालीन सहकार्य करण्याचा स्पष्ट हेतू व्यक्त केला.

प्राडा कडून एक महत्त्वपूर्ण घोषणा म्हणजे – त्यांच्या तांत्रिक तज्ज्ञांची एक टीम विशेषतः कोल्हापुरी चप्पल व इतर हस्तकला उत्पादक यांच्यासाठीपुढील आठवड्यात महाराष्ट्रात भेट देणार आहे. या दौऱ्यात पारदर्शक, ESG–अनुरूप आणि शाश्वत स्थानिक पुरवठा साखळी भागीदारांची निवड करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र चेंबर या दौऱ्याचे समन्वयन करणार असून, नामांकित कारागीर, क्लस्टर्स आणि प्रमाणित उत्पादकांशी प्राडा टीमची भेट घडवून आणणार आहे.

प्राडा ने स्थानिक कारागिरांच्या सहकार्याने एक मर्यादित आवृत्तीतील मेड इन इंडिया – कोल्हापुरी प्रेरित संग्रह लाँच करण्याचा मानसही व्यक्त केला. या कलेक्शनमध्ये GI टॅगचे पालन केले जाईल व महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचे जागतिक स्तरावर प्रतिनिधित्व केले जाईल. ही पुढाकार ग्रामिण कारागीरांच्या जागतिक पातळीवरील सहभागासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

या अनुषंगाने प्राडा ग्रुपने त्यांच्या यशस्वी Made in मोहिमांचे जागतिक उदाहरणे सादर केली – जसे की Made in Peru, Made in Japan, Made in Scotland. तसेच, त्यांनी Made in India - Kolhapuri कलेक्शनसाठी एक प्रारंभिक संकल्पनाही मांडली.

महाराष्ट्र चेंबर ने यावेळी पैठणी, हिमरू, बिछवा/पायल (नुपूर), व स्थानिक भरतकामासारख्या पारंपरिक हस्तकला प्रकल्पांवर सहकार्य करण्याचा प्रस्ताव मांडला. प्राडा ग्रुपने त्यालाही सकारात्मक प्रतिसाद दिला आणि भावी संग्रहात समावेश करण्यासाठी या हस्तकलांचा अभ्यास करण्याची तयारी दर्शवली.

भारतीय व इटालियन कारागिरांमध्ये प्रशिक्षण, ज्ञान व नवकल्पनांची देवाण–घेवाण घडवून आणण्यासाठी संरचित प्रशिक्षण व क्रॉस–कल्चरल प्रकल्प राबवण्याचीही चर्चा झाली. डिझाइन इनोव्हेशन आणि शाश्वत उत्पादन हे या सहकार्याचे मुख्य उद्दिष्ट राहणार आहे.

अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, हा उपक्रम पारंपरिक समुदायांसोबत जागतिक फॅशन कशी आदरपूर्वक काम करू शकते याचे एक मॉडेल ठरू शकतो. प्राडा ग्रुपच्या प्रामाणिकपणाचे आम्ही स्वागत करतो आणि यावर पुढील पायऱ्या उभारण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.

या बैठकीत दिलीप गुप्ता (प्रादेशिक उपाध्यक्ष, पश्चिम महाराष्ट्र), संगीता पाटील (प्रादेशिक उपाध्यक्षा, उत्तर महाराष्ट्र), धनश्री हरदास (अध्यक्ष, महिला उद्योजकता समिती), नेहा गुप्ता (इंटरनॅशनल फॅशन बिझनेस एक्सचेंज कौन्सिल), संजय शेटे (अध्यक्ष, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स), शिवाजीराव पवार (अध्यक्ष, कोल्हापूर जिल्हा फुटवेअर असोसिएशन), गणेश गवळी, रोहित दोईफोडे, राजन सातपुते (फुटवेअर उत्पादक व विक्रेते), विकास आच्छा, ॲड. ईशान पाटकर आणि ॲड. राहुल हिंगमिरे (गव्हर्निंग कौन्सिल सदस्य) यांनी सहभाग घेतला.

# Business Standard

## Prada explores collaboration with Indian footwear artisans after sandal row

*The furore even saw sales of Indian sandals boom, with sellers and artisans seeing the controversy as a way to promote the heritage craft by tapping into nationalist pride*

**By Dhwani Pandya and Elisa Anzolin**

Prada is looking to collaborate with "artisanal footwear" makers in India in a partnership, it said on Friday, two weeks after the Italian luxury group triggered a controversyby debuting ethnic sandals resembling 12th-century Indian ones.

After viral photos from a Milan fashion show drew criticism from Indian artisans who make the sandals named after the historic city of Kolhapur in Maharashtra state Prada was forced late last month to acknowledge that its new open-toe footwear was inspired by ancient Indian designs.

The furore even saw sales of Indian sandals boom, with sellers and artisans seeing the controversy as a way to promote the heritage craft by tapping into nationalist pride.

Prada said in a statement to Reuters that it held talks remotely on Friday with the Maharashtra Chamber of Commerce, which represents 3,000 Kolhapuri sandal artisans, and discussed potential opportunities for future collaboration.

"The next step will be for Prada's supply chain team to meet a range of artisanal footwear manufacturers," the company said.

The Maharashtra Chamber of Commerce said that Lorenzo Bertelli, son of Prada's owners and head of its corporate social responsibility, joined the talks on Friday.

The chamber of commerce said that during the talks Prada said it aimed to launch a limited-edition "Made in India" Kolhapuri-inspired collection of sandals in partnership with Indian artisans.

India's luxury market is small but growing, with the rich splurging on designer fashion, top end sports cars and pricey watches.

Prada does not have any retail stores in India, and its products are usually reserved for the super rich who shop overseas.

The sandal scandal left the social media abuzz for days with criticism and sarcastic memes, with Indian politicians, artisans and the Maharashtra Chamber of Commerce demanding due credit to Indian heritage.




# Prada team to meet Kolhapuri chappal artisans for collab

Abhijeet.Patil
@timesofindia.com



TRAD VS TREND

**Kolhapur:** Prada Group is set to send a supply chain team to meet Kolhapuri chappal artisans to discuss potential opportunities for future collaboration, the Italian fashion house told **TOI** in a written response after a meeting with the office-bearers of Maharashtra Chamber of Commerce Industry and Agriculture (MACCIA) and other stakeholders on Friday.

The meeting was held online with Prada officials joining from Milan, Italy, MACCIA office-bearers led by president Lalit Gandhi from Mumbai, and representatives of artisans and traders from Kolhapur. *The brand had faced criticism after its men's footwear, showcased during the Spring/Summer 2026 Menswear Show in Milan, resembled the traditional footwear from Kolhapur, popularly called Kolhapuri chappals. Prada Group subsequently acknowledged its collection was inspired by the GI-tagged traditional footwear from Maharashtra and Karnataka. It had said it wished to engage with the artisans for further collaboration. A meeting to discuss this was held on Friday.*

Responding to a **TOI** query, Prada Group stated that "the meeting was held successfully" and represented "an important moment in building mutual understanding and generating meaningful exchange to discuss potential opportunities for future collaboration".

The group said: "The next step will be for Prada's supply chain team to meet a range of footwear manufacturers, and the Maharashtra Chamber of Commerce has kindly agreed to support in identifying GI-approved manufacturers." MACCIA president Lalit Gandhi said Prada had expressed an intent to launch a limited edition "Made in India" Kolhapuri-inspired collection in partnership with local artisans.

# पुढारी

## 'कोल्हापुरी'च्या कारागिरांशी 'प्राडा' करणार भागीदारी करार

### चेंबर ऑफ कॉमर्सच्या पुढाकाराने बैठकीत निर्णय

**मुंबई/कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जगप्रसिद्ध कोल्हापुरी चप्पलसह पारंपरिक भारतीय पादत्राणे तयार करणाऱ्या कारागिरांसोबत आता 'प्राडा' हा आंतरराष्ट्रीय फॅशन ब्रँड भागीदारी करणार आहे. दोन आठवड्यांपूर्वीच प्राडाने मिलान मेन्स फॅशन वीकमध्ये कोल्हापुरी चप्पलची कॉपी असलेली पादत्राणे लाँच केली होती. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाद निर्माण झाल्यावर प्राडाने हा निर्णय घेतला आहे. यामुळे आता कोल्हापुरी जागतिक पातळीवर आणखी दिमाखात पोहोचणार आहे.

प्राडाने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्ससोबत एक बैठक घेतली. या बैठकीत भविष्यातील भागीदारीच्या शक्यतांवर चर्चा झाली, असे प्राडाने वृत्तसंस्थेला दिलेल्या निवेदनात स्पष्ट केले आहे.

पुढील टप्प्यात प्राडाच्या पुरवठा साखळी टीमकडून विविध पारंपरिक पादत्राण निर्मात्यांची भेट घेतली जाणार आहे, असे कंपनीने सांगितले. चेंबरने या ऑनलाईन बैठकीचे काही फोटो 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर केले आहेत. यात म्हटले आहे की, आमची भागीदारी जागतिक फॅशन आणि पारंपरिक समुदायांमधील सहकार्याचे उत्तम उदाहरण ठरू शकते. या चर्चेत प्राडा कंपनीच्या मालकांचे चिरंजीव लोरेंझो बर्टेली यांनीही सहभाग घेतला, असे चेंबरने सांगितले.

**वाद का झाला?**

प्राडाने दोन आठवड्यांपूर्वी मिलान फॅशन वीकमध्ये एक ओपन टो सँडल सादर केले. याला लेदर सँडल असे संबोधले होते. पण भारतीय फॅशन तज्ज्ञ, कारागीर, बॉलीवूड कलाकार आणि काही राजकारण्यांनी यावर टीका केली. कारण ही चपल कोल्हापुरी चपलांची हुबेहूब नक्कल असल्याचे स्पष्ट दिसत होते. प्राडाने कोल्हापुरी चप्पल आपलेच असल्याचे भासवत लाँच केले. त्यामुळेच वाद उफाळला.

"महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या पुढाकाराने प्राडाने सुरू केलेला संवाद महत्त्वपूर्ण टप्प्यावर आला असून, जगातील सर्वात मोठ्या ब्रँडची टीम कोल्हापुरात येऊन कारागिरांशी संवाद साधणार आहे. या महत्त्वपूर्ण घटनेमुळे कोल्हापुरी चप्पलबरोबरच हुपरीचे पैंजण, कोल्हापुरी साज, महाराष्ट्रातील पैठणी अशा उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत स्थान मिळणार आहे.

**ललित गांधी,**
अध्यक्ष महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज

Kolhapur Edition
Jul 13, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

# NDTV Profit

## Prada Keen To Launch Limited-Edition 'Kolhapuri-Inspired' Collection: MACCIA

"Prada expressed intent to launch a limited-edition Made-in-India Kolhapuri-inspired collection in partnership with local artisans," an official statement from MACCIA said.

Italian fashion major Prada on Friday expressed its intention to launch a Kolhapuri-inspired collection in partnership with local artisans, an industry grouping has said. Maharashtra Chamber of Commerce, Industries and Agriculture, which held a virtual meeting with senior Prada officials earlier in the day, said a technical expert team from the Italian fashion brand will be visiting India next week to identify local supply chain partners for Kolhapuri chappal.

"Prada expressed intent to launch a limited-edition Made-in-India Kolhapuri-inspired collection in partnership with local artisans," an official statement from MACCIA said.

It can be noted that the use of the centuries-old craft of Kolhapuri sandals (chappal) by Prada in a fashion show last month triggered a controversy on the contributions of Indian artisans and the way they are leveraged by global brands.

MACCIA president Lalit Gandhi told PTI that the Italian team visiting India next week will examine product facilities, look at how those match up to their standards and define the systems for the way ahead.

In the meeting, which had a slew of Prada officials -- including chief business development officer Roberto Massardi and group head of corporate social responsibility Lorenzo Bertelli, among others -- the Italian group has committed to include the 'Kolhapuri' mention in all its publications and commercialise the offering only after complying with GI (geographical indication) requirements, he added

As per MACCIA, Prada presented their 'early vision' for a Made-in-India 'Kolhapuri collection, and also cited successes behind similar tie-ups with Peru, Japan, and Scotland in the past.

In the meeting, the chamber appealed to Prada for expanding the proposed collaboration beyond the Kolhapuri chappal to include heritage crafts, such as Paithani weaving, Himroo textiles, Bichwas/Payal (anklets), and regional embroidery work.

Prada responded positively and agreed to explore these crafts for potential integration into future collections," the industry grouping said.

Gandhi said MACCIA has also asked Prada to set up an excellence lab in Maharashtra for spotting and sourcing, which will help the local wares get access to premium markets the world over.

At least four representatives from Kolhapur closely associated with the chappal sector were part of the meeting, apart from some officials from MACCIA, Gandhi said.

VARIETY | SAVI BOMBAY TIMES, THE TIMES OF INDIA | SUNDAY, JULY 13, 2025 | 7

# Prada partners with Kolhapuri artisans after design row

Prada has announced a partnership with Indian artisans to create a special sandal collection, following criticism that its recent designs closely resembled traditional Indian footwear.

Photos from a recent Milan fashion show went viral and sparked backlash from Indian artisans, who accused the brand of replicating their heritage craft without acknowledgement. In response to the criticism, Prada was compelled late last month to admit that ancient Indian designs had inspired its open-toe footwear.

In a statement to Reuters, Prada confirmed it had held a remote meeting on Friday with the Maharashtra Chamber of Commerce, which represents 3,000 Kolhapuri sandal artisans. The parties reportedly explored possibilities for future collaboration.

"The next step will be for Prada's supply chain team to meet a range of artisanal footwear manufacturers," the company was quoted by Reuters.

According to the Maharashtra Chamber of Commerce, Lorenzo Bertelli, son of Prada's owners and head of the brand's corporate social responsibility initiatives, took part in the discussions. During the meeting, Prada is said to have expressed its intention to launch a limited-edition "Made in India" collection of Kolhapuri-inspired sandals in partnership with local artisans.









गुंडेवाडी येथील विवाहिता ऋतुजा घटनेनंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करून आमदार पडळकर यांनी शुक्रवारी केला.

# 'प्राडा'चा 'मेड इन इंडिया'चा नारा

## संयुक्त बैठकीत एकमत; इटलीवरून पथक कोल्हापुरात येणार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ११ : 'मेड इन इंडिया-कोल्हापुरी' ब्रॅण्डने कोल्हापुरी चप्पलसह अन्य हस्तकला उत्पादने तयार करण्याचा मानस आज 'प्राडा'च्या अधिकाऱ्यांनी ऑनलाईन बैठकीत व्यक्त केला. तसेच कोल्हापुरी चप्पल नेमके कसे बनते, हे पाहण्यासाठीही प्राडा ग्रुपचे तांत्रिक विभागाचे पथक इटलीहून कोल्हापुरात येणार आहे. साधारण १५ किंवा १६ जुलैला ते महाराष्ट्रात येतील, असेही सांगण्यात आले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर (एमएसीसीआयए) आणि आंतरराष्ट्रीय लक्झरी फॅशन ब्रँड 'प्राडा' ग्रुप यांच्यात दुपारी ऑनलाईन बैठक झाली. महाराष्ट्र चेंबर अध्यक्ष ललित गांधी अध्यक्षस्थानी होते. इटलीतील शोमध्ये हेच कोल्हापुरी चप्पल 'प्राडा'च्या २०२६ च्या उन्हाळी प्रदर्शनात समाविष्ट करण्यात आले होते. त्यानंतर सुरू झालेल्या चर्चेअंती ही बैठक झाली.

बैठकीत 'प्राडा'ने स्थानिक कारागिरांच्या सहकार्याने एक मर्यादित आवृत्तीतील 'मेड इन इंडिया-कोल्हापुरी' प्रेरित संग्रह लाँच करण्याचा मानसही व्यक्त केला. या कलेक्शनमध्ये जीआय टॅगचे पालन केले जाईल. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचे जागतिक स्तरावर प्रतिनिधित्व केले जाईल. या अनुषंगाने प्राडा ग्रुपने त्यांच्या यशस्वी 'मेड इन' मोहिमांची जागतिक उदाहरणे सादर केली. 'मेड इन पेरू', 'मेड इन जपान', 'मेड इन स्कॉटलॅन्ड' अशाच पद्धतीने 'मेड इन इंडिया-कोल्हापुरी' कलेक्शनसाठी एक प्रारंभिक संकल्पनाही मांडली.

याचवेळी महाराष्ट्र चेंबरने यावेळी पैठणी, हिमरू, बिछवा/पायल (नुपूर) व स्थानिक भरतकामासारख्या पारंपरिक हस्तकला प्रकल्पांवर सहकार्य करण्याचा प्रस्ताव मांडला. 'प्राडा'ग्रुपने त्यालाही सकारात्मक प्रतिसाद दिला.

दरम्यान, भारतीय व इटालियन कारागिरांमध्ये प्रशिक्षण, ज्ञान व नवकल्पनांची देवाण-घेवाण घडवून आणण्यासाठी संरचित प्रशिक्षण व आंतर सांस्कृतिक संवाद प्रकल्प राबवण्याचीही चर्चा झाली. 'डिझाइन इनोव्हेशन' आणि शाश्वत उत्पादन हे या सहकार्याचे मुख्य उद्दिष्ट राहणार आहे. या बैठकीत 'प्राडा ग्रुप' कडून लोरेन्झो बर्टेली (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी प्रमुख), ख्रिस्तोफर बग (ग्लोबल कम्युनिकेशन्स संचालक), रोबर्टो मास्सार्डी (मुख्य अधिकारी व्यापार प्रगती), श्रीमती फ्रांसेस्का सेकंदारी, श्रीमती वॅलेंटिना इस्मे पिकाटो आदींचा सहभाग होता.

तसेच दिलीप गुप्ता (प्रादेशिक उपाध्यक्ष, पश्चिम महाराष्ट्र), संगीता पाटील (प्रादेशिक उपाध्यक्षा, उत्तर महाराष्ट्र), धनश्री हरदास (अध्यक्ष, महिला उद्योजकता समिती), नेहा गुप्ता (इंटरनॅशनल फॅशन बिझनेस एक्स्चेंज कौन्सिल), संजय शेटे (अध्यक्ष, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स), शिवाजीराव पवार (अध्य... कोल्हापूर जिल्हा फूटवे... असोसिएशन), गणेश गवळी, रो... दोईफोडे, राजन सातपुते (फूटवे... उत्पादक व विक्रेते), वि... आच्छा, ईशान पाटकर आणि रा... हिंगमिरे (गव्हर्निंग कौन्सिल सद...) यांनी सहभाग घेतला.

**'सकाळ'च्या बैठकीतील मुद्द्यांना प्राधान्य**

'प्राडा'सोबत ऑनलाईन बैठक होण्यापूर्वी नेमकी कोणती भूमिका घ्यावी, याबाबत चर्मकार आणि कोल्हापुरी चप्पलबाबतची आजची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी महाराष्ट्र चेंबर आणि 'सकाळ' यांची कोल्हापूर कार्यालयात बैठक झाली होती. या बैठकीत चर्मकारांनी त्यांच्या समस्या, कोल्हापुरी चप्पलबाबतची भूमिका आणि त्यांच्या अपेक्षांचे सविस्तर मुद्दे मांडले. त्याच अनुषंगाने आजच्या बैठकीत संवाद झाला.



कोल्हापूर : 'प्राडा' ग्रुपबरोबर व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये शुक्रवारी संवाद साधताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी.

"महाराष्ट्र चेंबरने या चर्चेत सांस्कृतिक आदर, सह-ब्रँडेड विकास, आणि फेअर ट्रेड (न्याय्य व्यापार) या तत्त्वांवर आधारित सहा मुद्दे मांडले. प्राडा ग्रुपने सर्व मुद्द्यांवर सकारात्मक प्रतिसाद दिला. महाराष्ट्रातील पारंपरिक कारागिरांशी दीर्घकालीन सहकार्य करण्याचा स्पष्ट हेतू व्यक्त केला. हा उपक्रम पारंपरिक समुदायांसोबत जागतिक फॅश... कशी आदरपूर्वक काम करू शकते, याचे एक मॉडेल ठरू शकतो. 'प्राडा' ग्रुपच्या प्रामाणिकपणाचे आम्ही स्वागत करतो... यावर पुढील पायऱ्या उभारण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत."
**- ललित गांधी**, अध्यक्ष महाराष्ट्र चेंबर

...retired pvt company employee from Wagholi lost Rs15 lakh and Rs 95 lakh, respectively, to cybercrooks in similar manner. | ...ve the reports, we will carefully review the findings and determine the appropriate course of action based on the evidence and any potential food safety | staff and showed them. They didn't accept there was any issue with food handling, so I made a video," Jalagi said. "What if I bit into the slice and hurt | to calm him down and to keep other patrons from becoming uncomfortable with the commotion, I apologised on the video."

# Prada team to meet Kolhapuri chappal artisans to discuss future collaborations

Abhijeet.Patil@timesofindia.com

**Kolhapur:** Prada Group is set to send a supply chain team to meet Kolhapuri chappal artisans to discuss potential opportunities for future collaboration, the global brand of the Italian fashion house told **TOI** in a written response after a meeting with the office-bearers of Maharashtra Chamber of Commerce Industry and Agriculture (MACCIA) and other stakeholders on Friday.

The meeting was held online with Prada officials joining from Milan, Italy, MACCIA office-bearers led by president Lalit Gandhi from Mumbai and representatives of artisans and traders from Kolhapur. The brand had faced criticism after its footwear meant for men, showcased during Spring/Summer 2026 Menswear Show in Milan, resembled the traditional footwear from Kolhapur, popularly called Kolhapuri chappals, in Maharashtra.

Prada Group subsequently acknowledged that its collection was inspired by the GI-tagged traditional footwear from Maharashtra and Karnataka. The group had said it wished to engage with the artisans for further collaboration. A meeting to discuss this was organised online on Friday.

Responding to a **TOI** query after the meeting, Prada Group stated that "the meeting was held successfully" and it represented "an important moment in building mutual understanding and generating meaningful exchange to discuss potential opportunities for future collaboration".

The group said: "The next step will be for Prada's supply chain team to meet a range of footwear manufacturers, and the Maharashtra Chamber of Commerce has kindly agreed to support in identifying GI-approved manufacturers that Prada Group could potentially collaborate with."

Elaborating on the meeting, MACCIA president Lalit Gandhi said the Italian fashion house had expressed intent to launch a limited-edition "Made in India" Kolhapuri-inspired collection in partnership with local artisans," he said.

"To support this, the Prada team showcased successful global examples of their prior 'Made in' campaigns—featuring Made in Peru, Made in Japan, and Made in Scotland product lines. They also presented their early vision for a Made in India–Kolhapuri collection, reinforcing their commitment to honouring craft origins while building meaningful global stories around them," Gandhi said.

MACCIA further proposed collaboration on heritage crafts, such as Paithani weaving, Himroo textiles, Bichwas/Payal (anklets), and regional embroidery work. "Prada responded positively and agreed to explore these crafts for potential integration into future collections," the MACCIA president said.

**Sandals inspired by Kolhapuri chappals: Prada**

A day after artisans who craft Kolhapuri chappals complained to CM Fadnavis that Prada had featured the famous footwear on the ramp during its Spring Summer show in Milan recently without acknowledging it, the Italian...

TOI report on June 28, 2025



◆ कोल्हापूरी चप्पल व हस्तकला यासंबंधी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्यासोबत चर्चा करताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रिजचे अध्यक्ष ललित गांधी सोबत प्राडा कंपनीचे शिष्टमंडळ.

# प्राडा अन् कोल्हापुरी चपलेची जागतिक वीण जुळेल

## जिल्हाधिकाऱ्यांचा विश्वास; दर्जा व गुणवत्तेच्या जोरावर करार होऊ शकतो

**कोल्हापूर** : कोल्हापुरी चप्पल हे केवळ चर्मकार कारागिरांनी बनवलेले एक उत्पादन नाही, तर कोल्हापूरकरांचे या चप्पलसोबत भावनिक नातं आहे. कोल्हापूरच्या वैशिष्ट्यांमध्ये या चपलेचे स्थान अग्रभागी आहे. त्यामुळे भविष्यात प्राडासारख्या जगद्विख्यात ब्रँडसोबत कोल्हापूरचे नाव जोडले जाणार असेल, तर तो कोल्हापूरकरांसाठी अभिमान आहे. या चपलेच्या दर्जा व गुणवत्तेच्या आधारे भविष्यात करार करण्याचे संकेत प्राडाच्या शिष्टमंडळाकडून मिळाले आहेत. यानिमित्ताने प्राडा आणि कोल्हापुरी चप्पल यांच्यात जागतिक वीण जुळेल असा विश्वास जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी व्यक्त केला.

कोल्हापूर दौऱ्याअंतर्गत महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली प्राडा कंपनीच्या पाओलो टिव्हरॉन, डॅनियल कोंटू, आंद्रिया पोलास्ट्रेली, रॉबर्टो पोलास्ट्रेली, आंद्रिया बोस्कारो या सदस्यांनी येडगे यांची भेट घेऊन कोल्हापुरी चप्पल व इतर पारंपरिक वस्तूंबाबत चर्चा केली.

कोल्हापुरी चप्पलसंबंधी सुरू असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती जिल्हाधिकारी येडगे यांनी शिष्टमंडळाला दिली. यावेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष ललित गांधी, जिल्हा उद्योग केंद्राचे उद्योग अधिकारी बालाजी बिराजदार आणि मेघ गांधी उपस्थित होते.

येडगे म्हणाले, कोल्हापुरी चप्पल या स्थानिक कारागिरांच्या कौशल्याचे प्रतीक आहेत. गेल्या सातशे वर्षांची परंपरा असलेल्या कोल्हापुरी चप्पल निर्मितीत चर्मकार समाजाच्या कित्येक पिढ्यांनी वारसा जपला आहे. प्राडासारख्या आंतरराष्ट्रीय ब्रँडच्या नकाशावर कोल्हापुरी चपलेचा समावेश होणार असेल, तर ते कारागिरांचे श्रेय आहे. यावेळी ललित गांधी यांनी कोल्हापुरी साज, ठुशी आदी पारंपरिक वस्तूंची माहिती दिली. यावेळी शिष्टमंडळाने सांगितले की, भविष्यात कंपनीमार्फत येथील पारंपरिक वस्तू उत्पादन गुणवत्ता वाढवून आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी करार करण्याचा विचार केला जाऊ शकतो. कंपनीच्या बोर्ड मिटिंगमध्ये निर्णय झाल्यानंतर महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर शी यासंबंधी संपर्क करण्यात येईल.




◆ **खास. पी.पी.चौधरी यांच्या अध्यक्षतेखालील संयुक्त संसदीय समितीच्या बैठकीप्रसंगी खास. सुप्रिया सुळे, खास. अनुराग ठाकुर, खास. धर्मेंद्र यादव, मधुर भांडारकर, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, श्रीकृष्ण परब, निलाक्षी अय्यर व अन्य मान्यवर.**

# एक देश - एक निवडणुकीमुळे उद्योग-व्यापारावरील परिणामाचा अहवाल 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' ने द्यावा - पी. पी. चौधरी

## संयुक्त संसदीय समिती ने दिली जबाबदारी

**मुंबई** : एक देश-एक निवडणुकीसाठी प्रस्तावित घटना दुरस्ती संदर्भात विविध घटाकांचे अभिप्राय व चर्चेसाठी मुंबई दौऱ्यावर आलेल्या संयुक्त संसदीय समिती ने या घटना दुरस्तीमुळे उद्योग-व्यापार व अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांमुळे सविस्तर अहवाल देण्याची जबाबदारी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ला दिल्याची माहीती चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

सोमवार दि. १९ मे रोजी संयुक्त संसदीय समितीपुढे या विषयावर सादरीकरणासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ला आमंत्रित करण्यात आले होते.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या वतीने अध्यक्ष ललित गांधी यांनी सादरीकरण केले व वारंवार होणाऱ्या वेगवेगळ्या निवडणुकांमुळे उद्योग-व्यापार - अर्थकारण - शेती या घटकांवर होणाऱ्या प्रतिकुल परिणामांवरील अहवाल सादर केला.

यामध्ये प्रामुख्याने धोरणात्मक अडथळे, व्यापार-उद्योगावरील आर्थिक परिणाम कर्मचारी रजांमुळे उत्पादनावर होणार परिणाम आदर्श आचारसंहितेमुळे येणारे अडथळे आदी बाबीवरील हरकती विशद करून एक राष्ट्र - एक निवडणुक या संकल्पनेबाबत पाठींबा दर्शवला.

संयुक्त संसदीय समितीमध्ये अध्यक्ष खासदार पी.पी. चौधरी यांनी महाराष्ट्र चेंबर चा प्रारंभिक अहवाल महत्वपुर्ण असल्याचे नमुद करून याविषयी सविस्तर अहवाल अपेक्षित असल्याचे सांगितले व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री




ॲण्ड ॲग्रीकल्चर ने येत्या सहा महिन्याच्या आत उद्योग-व्यापार-कृषि उद्योग व अर्थव्यवस्था यावरील अनुकुल-प्रतिकुल परिणामांच्या सविस्तर विश्लेषणासह अहवाल सादर करावा अशी सुचना केली.

अध्यक्ष ललित गांधी यांनी संयुक्त संसदीय समिती ने दिलेल्या निर्देशनानुसार अहवाल देण्याची ग्वाही दिली. यावेळी झालेल्या चर्चेत खासदार परशोत्तम रूपाला, मोहम्मद बशीर, खासदार सुप्रिया सुळे, खासदार अनुराग ठाकुर यांनी सहभाग घेतला. महाराष्ट्र चेंबर च्या प्रतिनिधि मंडळात उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, श्रीकृष्ण परब सेक्रेटरी जनरल निलाक्षी अय्यर यांचा सहभाग होता.

याप्रसंगी बॉलीवुड तर्फे मधुर भांडारकर, नॅशनल स्टॉक एक्सचेंज चे आशिषकुमार चौहाण यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

# एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीतर्फे 'कम्यूनिटी बिल्डींग फॉर इन्कलुसिव्ह इकॉनॉमिक ग्रोथ ॲलण्ड डेव्हलपमेंट' परिषदसंपन्न

## यशस्वी उद्योजकासाठी कष्ट, नियोजन व प्रामाणिकता महत्वाची - नाम. ललित गांधी







◆ **'कम्यूनिटी बिल्डींग फॉर इन्कलुसिव्ह इकॉनॉमिक ग्रोथ ॲ ण्ड डेव्हलपमेंट' परिषदेचे उदघाटन करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष व जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष (राज्यमंत्री) नाम. ललित गांधी समवेत एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड, योगेश पाटील.**

**नाशिक, दि. ३१ मे :** कष्ट करण्याची तैयारी, सचोटी, प्रामाणिकता, विश्वास, जे बोलेल तसेच वागावे, प्रत्येक गोष्टीचे नियोजन आणि संध्याकाळी हिशोबाचे सूत्र हे यशस्वी उद्योजक व व्यवसायिकाचे लक्षण आहे असे मार्गदर्शन महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष व जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष (राज्यमंत्री) नाम. ललित गांधी यांनी केले. ही परिषद विशेषता शेतकऱ्यांना उद्योजक बनविण्यासाठीचा प्रयत्न आहे. डॉ. राहुल कराड यांनी देशाचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी व समाजाचे चांगले करण्याचा हा छोटासा उपक्रम आहे. यशस्वी व्हायचे असेल तर शेठ हिरांचद याचे चरित्र वाचण्याचा सल्ला ही त्यांनी दिला.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीतर्फे आयोजित दोन दिवसीय 'कम्यूनिटी बिल्डींग फॉर इन्कलुसिव्ह इकॉनॉमिक ग्रोथ ॲण्ड डेव्हलपमेंट' परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड होते.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल कराड यांनी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष व जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष (राज्यमंत्री) नाम. ललित गांधी यांचा सत्कार केला.

याप्रसंगी व्यासपीठावर विनजीत टेक्नॉलॉजी प्रा.लि.चे सह संस्थापक अश्विन कंडोई, वास्तू ग्रुप चे चेअरमन उदय घुगे, इंन्फोटेक सॉफ्टवेअर अँड सिस्टमचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अशिम पाटील, नाशिक येथील सह्याद्री फर्मचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे, आर्मस्ट्रॉग डेमॅटिकचे चेअरमन विनीत माजगावकर, योगेश पाटील, एमआयटी डब्ल्यूपीयूचे प्र. कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे हे उपस्थित होते.

डॉ. राहुल कराड म्हणाले, सध्याच्या जगात इकॉनॉमिक वॉर सुरू आहे. अशा वेळेस देशात व्यवसायात वृद्धी होणे गरजेचे आहे. या युगात वाणिज्यला बुश करण्याची गरज आहे. तसेच देशात जीतो सारखे मॉडल उभारूण प्रगती साधता येते. त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांशी जोडण्याचा प्रयत्न करावा.

असिम पाटील म्हणाले, व्यक्ती हा पुस्तकातून नाही तर परिस्थितितून शिकत राहतो. व्यवसायात एक चूक वारंवार करू नये. प्रामाणिक काम करतांना कर्मचार्यां बरोबर ही प्रामाणिक रहावे. या देशात आरएफआयडी कोड टेक्नॉलॉजीचा वापर सर्वच व्यक्ती करतात असे ही ते म्हणाले.

विलास शिंदे म्हणाले, सहकारांच्या तत्वावरच देशातील शेतकर्यांच्या प्रश्नांचे निराकरण करता येईल आणि हे सह्याद्रीच्या माध्यमातून सिद्ध झाले आहे. शेतकर्यांची वास्तविकता पाहता त्यांनी आंत्रप्रेन्यूअर मांइड सेट तयार करावा आणि मार्केट शोधावे.

अश्विन कंडोई यांनी जीवनात यशस्वी उद्योजक होण्यासाठी जागतिक विचारधारा, कर्म्फट झोन सोडणे, नवीन शिकणे, टेक्नॉलॉजीवर अधिखर्च करणे आणि ह्यूमन रिर्सार्स व ह्यूमन कॅपिटल वर खर्च करण्याचा सल्ला दिला. तसेच विनित माजगावकर यांनी ब्रॅड तयार करण्यासाठी नवनिर्मिती आणि ज्ञानाच्या आधारे शाश्वत व्यावसाय करण्याचा सल्ला दिला.

यावेळी चितळे ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक गिरीश चितळे यांनी ऑनलाइन मार्गदर्शन केले. तसेच डॉ. मिलिंद पांडे यांनी व्यवसायाचे नियम सांगितले.

उदय घुगे यांनी परिषदेची प्रस्तावना मांडली. सूत्रसंचालन डॉ. गौतम बापट यांनी केले. योगेश पाटील यांनी आभार मानले.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष संजय सोनवणे, कृषी व ग्रामविकास समितीचे चेअरमन राजाराम सांगळे, माजी उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, विजय वेदमुथा, योगेश शिंदे, सहायक सचिव अविनाश पाठक यांच्यासह तज्ञ उद्योजक उपस्थित होते.





◆ केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना महाराष्ट्रातील विमानसेवा संबंधी निवेदन देऊन चर्चा करताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अध्यक्ष ललित गांधी सोबत संदीप भंडारी.

# महाराष्ट्रातील विमानतळ व विमान सेवांचे सक्षमीकरण करू : केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ

## महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी घेतली भेट

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रातील सध्या कार्यरत असलेले विमानतळ, नवीन प्रस्तावित विमानतळ यांच्या विस्ताराबरोबरच विमान सेवा व विमान मार्गांचा विस्तार करून महाराष्ट्रातील एकूण विमानसेवांचे सक्षमीकरण करण्यावर विशेष लक्ष दिले जाईल अशी ग्वाही केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री नामदार मुरलीधर मोहोळ यांनी दिली. महाराष्ट्रातील विविध विमानतळांच्या प्रश्नासंबंधी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री माननीय नामदार मुरलीधर मोहोळ यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली त्याप्रसंगी ते बोलत होते.

लवकरच यासंबंधी चेंबरच्या पदाधिकाऱ्यां समवेत संयुक्त बैठक घेऊ अशी ग्वाहीही मंत्री महोदयांनी दिली. सोलापूर विमानतळ पूर्णपणे तयार असून या विमानतळावरून तात्काळ विमान सेवा सुरू करण्याची व या विमानतळाला भारतातील विमान निर्मिती उद्योगाचे जनक व सोलापूरचे सुपुत्र शेठ वालचंद हिराचंद यांचे नाव देण्याची आग्रही मागणी ललित गांधी यांनी यावेळी केली.

कोल्हापूर विमानतळावरून नवीन मार्ग सुरू करणे कोल्हापूर–दिल्ली, कोल्हापूर–जोधपुर या नवीन मार्गांची मागणी सुद्धा यावेळी सादर करण्यात आली. त्याचबरोबर धावपट्टी विस्तारीकरणाचे काम गतीने पूर्ण करण्याबाबतही चर्चा करण्यात आली. सोलापूर विमानतळावरील विमान सेवा लवकरात लवकर सुरू करू अशी ग्वाही नाम दार मोहोळ यांनी यावेळी दिली. अमरावती व रत्नागिरी विमानतळ सुद्धा लवकरात लवकर सुरू करावेत असा प्रस्ताव ललित गांधी यांनी सादर केला. तसेच कोल्हापूर विमानतळाला छत्रपती राजाराम महाराज यांचे नाव देण्याच्या निर्णयाची लवकरात लवकर अंमलबजावणी करावी अशी आग्रही मागणी ललित गांधी यांनी केली. यावेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या कौशल्य विकास समितीचे चेअरमन संदीप भंडारी उपस्थित होते.

# महाराष्ट्रातील उद्योग क्षेत्रातील नियंत्रणे कमीत कमी करून उद्योग क्षेत्राला अव्वल स्थानावर ठेवु : मुख्य सचिव राजेश मीणा

## महाराष्ट्रात व्यापार कल्याण बोर्ड ची स्थापना करण्याची महाराष्ट्र चेंबर ची आग्रही मागणी

### राज्याचे मुख्य सचिव राजेश मीणा व केंद्रीय सचिव राजेश अगरवाल यांच्या उपस्थितीत महत्वपूर्ण धोरणात्मक बैठकीत दिशादर्शक चर्चा



◆ **केंद्रीय सचिव राजेश अगरवाल यांचे स्वागत करताना अध्यक्ष ललित गांधी व महाराष्ट्राचे मुख्य सचिव राजेश मीणा**

**मुंबई** : महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्राला सातत्याने अव्वलस्थानी ठेवण्यासाठी राज्य सरकार कटीबध्द असुन उद्योग क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी कमीत कमी नियंत्रणे ठेवुन उद्योग प्रेरक वातावरण निर्मितीसाठी राज्यातील उद्योग क्षेत्राची शिखर संस्था 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रीकल्चर' ने तसेच अन्य संस्थानी दिलेल्या सुचनांचा सकारात्मक विचार करून सुधारणा केल्या जातील अशी ग्वाही महाराष्ट्राचे मुख्य सचिव राजेश मीणा यांनी दिली.

महाराष्ट्र सरकारतर्फे केंद्रीय सचिव श्री. राजेश अगरवाल यांच्या विशेष उपस्थितीत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नियंत्रणमुक्त सुधारणा विषयांवर चर्चेसाठी मंत्रालयाच्या सभागृहात बोलविलेल्या बैठकीप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी विकास आयुक्त दिपेन्द्र कुशवाह (IAS) एम.आय.डी.सी चे सी.ईओ पी.वेलारासु (IAS), सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे (IAS) यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

विदर्भ औद्योगिक फेडरेशनचे किरण पातुरकर, टिसा चे अध्यक्ष संदिप पारेख, महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, उपाध्यक्ष संजय सोनवणे, दिलीप गुप्ता, संगीता पाटील, कांतीलाल चोपडा, विजय वेदमुथा, रमाकांत मालु यांनी चर्चेत भाग घेऊन विविध मुद्दे मांडले. महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांनी राज्यातील सरकारी व सहकारी औद्योगिक वसाहतींच्या संपुर्ण पायाभुत सुविधांचा विकास पुर्णपणे राज्य



◆ **बैठकीप्रसंगी विचारविमर्श करताना करताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, अध्यक्ष ललित गांधी**



◆ **बैठकीमध्ये सहभागी किरण पातुरकर, वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, टिसा चे अध्यक्ष संदिप पारेख, महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष संजय सोनवणे, दिलीप गुप्ता, संगीता पाटील, कांतीलाल चोपडा, विजय वेदमुथा, रमाकांत मालु**

सरकारने करावा, प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या कामकाजात पारदार्शिता व सुधारणा कराव्यात या मागण्या आग्रहपुर्वक मांडल्या.

तसेच राज्याच्या व्यापार क्षेत्राच्या समस्यांचे निराकरण व विकासासाठी केंद्र सरकारच्या सुचनेअनुसार राज्य व्यापार कल्याण मंडळ (Traders Welfare Board) ची स्थापना करण्याची आग्रही भुमिका मांडली.

केंद्रीय सचिव राजेश अगरवाल यांनी उद्योगस्नेही भुमिका व धोरण ठरविण्याची सुचना सर्व अधिकाऱ्यांना केली व पंतप्रधान नरेंद्र मोदी संपूर्ण देशात उद्योग स्नेही व उद्योग पुरक वातावरण व धोरण असावे यासाठी विशेषत्वाने आग्रही असल्याचे प्रतिपादन केले.

# कोल्हापूर जिल्ह्यात नाविण्यपूर्ण अशा मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियानाचा शुभारंभ

## आत्तापर्यंत झालेल्या कामांचा आदर्श ठेवत हे अभियान सर्व मिळून यशस्वी करू : पालकमंत्री प्रकाश आबिटकर











जिल्ह्यात १ मे पासून मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियान सुरू करीत असल्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकश आबिटकर यांनी जाहीर केले. हे अभियान सर्व मिळून यशस्वी करू असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या शुभारंभ सोहळ्या प्रसंगी जैन आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, महापालिका आयुक्त के.मंजुलक्ष्मी, प्रभारी पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील, अतिरीक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे, अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी, अधीक्षक अभियंता अभिजीत म्हेत्रे, बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता तुषार बुरूड यांच्यासह जिल्हास्तरावरील सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.

तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे तालुकास्तरावरील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमात १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमात राज्यात दुसरा क्रमांक मिळविल्याबद्दल जिल्हाधिकारी अमोल येडगे यांचा सन्मान पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केला.

याप्रसंगी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी जैन महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांचा सत्कार केला उपस्थित मान्यवरांनी अभियानाच्या पुस्तिकेचे प्रकाशनही केले. जैन अल्पसंख्याक महामंडळाचे अध्यक्ष ललीत गांधी यांनी आपल्या मनोगतामध्ये अभियानाच्या यशस्वीतेसाठी शुभेच्छा दिल्या.

### जिल्हाधिकाऱ्यांचा सन्मान

१०० दिवसांच्या कृती कार्यक्रमात राज्यात दुसरा क्रमांक मिळविल्याबद्दल जिल्हाधिकारी अमोल येडगे यांचा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सन्मान केला. सेवा हमी कायद्यातील पथदर्शी प्रकल्पातूनही जिल्ह्यात कौतुकास्पद काम झाले. यामुळे जिल्ह्याची मान अजून उंचावली आहे, असेही आबिटकर म्हणाले.






◆ महाराष्ट्र दिनानिमित्त शाहू स्टेडियम, कोल्हापूर येथे आयोजित शासकीय समारंभ नंतर पालकमंत्री प्रकाश आबिटकर, जैन आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी,जिल्हाधिकारी अमोल येडगे व अन्य मान्यवरांनी ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, व त्यांच्या कुटुंबीयांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच विविध सत्कार प्राप्त विद्यार्थ्यांचे कौतुक केले.




◆ महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून जिल्हा प्रशासनातर्फे दिव्यांग जणांना विविध उपकरणांचे वितरण करण्यात आले. कोल्हापूर जिल्हा पालकमंत्री नाम. प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष व जैन आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी, जिल्हाधिकारी अमोल येडगे, महापालिका आयुक्त के. मंजूलक्ष्मी आदी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत दिव्यांगांना तीन चाकी सायकली, व्हीलचेअर्स व अन्य उपकरणांचे वितरण करण्यात आले.

# देशाच्या प्रगतीमध्ये उद्योजकांचे योगदान महत्त्वाचे - ललित गांधी

## महाराष्ट्र चेंबर बारामतीच्या शाखेच्या च्या वतीने गुणवंतांचा सन्मान











**बारामती** : उद्योजक टिकला, तर अनेकांना रोजगार मिळतो. शहराचे वैभव वाढते. देशाचे नाव उज्ज्वल होते. अत्याधुनिक युगात उद्योजकांचे स्थान व योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन जैन अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळाचे अध्यक्ष व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे राज्य अध्यक्ष ललित गांधी यांनी केले. महाराष्ट्रदिनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड एग्रिकल्चर बारामती विभागीय कार्यालय यांच्या वतीने विविध क्षेत्रांतील गुणवंतांचा सन्मान आणि 'महाराष्ट्र गौरवगाथा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्या प्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी अपर पोलिस अधीक्षक गणेश बिरादार, प्रांताधिकारी वैभव नावडकर, क्रेडाई राज्य अध्यक्ष प्रफुल्ल तावरे, भारत फोर्जचे वरिष्ठ उपाध्यक्ष संजय अग्रवाल, बँक ऑफ महाराष्ट्रच्या मुख्य अधिकारी सुचिता जोशी, आर्यन बॉयलरचे राजेंद्र इंगवले आणि महाराष्ट्र चेंबर्सचे विभागीय चेअरमन शरद सूर्यवंशी, व्हा. चेअरमन शिवाजीराव सूर्यवंशी, सुशीलकुमार सोमाणी, सदस्य जगदीश पंजाबी, मनोज तुपे, विकास आडके, भारत जाधव, साईनाथ चौधरी आदी उपस्थित होते. गुणवंतांचा आदर्श घेऊन समाजातील नवीन गुणवंत तयार व्हावेत, या उद्देशाने सदर कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे शरद सूर्यवंशी यांनी सांगितले. एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, युनियन बँक ऑफ इंडियाचे रिजनल हेड मयंक भरद्वाज, कार्यकारी अभियंता एमआयडीसी बारामतीचे विजय पेटकर यांना 'उद्योगमित्र' पुरस्कार, तर कायनेटिक इलेव्हेटर्स पुणेचे शहाजी चांदगुडे, दिनकर भिसे, सिद्धेश प्रोजेक्ट अँड सर्व्हिसेस कंट्रक्शन टेक्नॉलॉजीचे कुशल खैरनार, ओम साई इंटरप्रायजेसचे संदीप मोरे सोनाली मोरे यांना 'उत्कृष्ट उद्योजक' पुरस्कार देण्यात आला. केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन आयपीएसपदी निवड झाल्याबद्दल अभिजित रामदास चौधर यांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक शिवाजीराव निंबाळकर यांनी केले. सूत्रसंचालन अनिल सावळे पाटील यांनी केले. ॲड. पी. टी. गांधी यांनी आभार मानले.





◆ **हाँगकाँग ट्रेड डेव्हलपमेंट कौन्सिलच्या साउथेस्ट एशिया आणि साउथ एशियाचे प्रादेशिक संचालक रोनाल्ड हो यांना स्मृतिचिन्ह देऊन स्वागत करतांना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी समवेत वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, उपाध्यक्षा संगीता पाटील, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, उपाध्यक्ष संजय सोनवणे, उपाध्यक्ष शंकर शिंदे, व्यवस्थापन समिती विशेष निमंत्रित सदस्य कांतीलाल चोपडा.**

# द्विपक्षीय व्यापार उद्योगाला चालना, व्यापार, उद्योगांना निर्यातीच्या संधी उपलब्ध होतील - ललित गांधी

## हाँगकाँग ट्रेड डेव्हलपमेंट कौन्सिलच्या साउथेस्ट एशिया आणि साउथ एशियाच्या शिष्टमंडळाची महाराष्ट्र चेंबरला भेट

हाँगकाँग ट्रेड डेव्हलपमेंट कौन्सिलच्या साउथेस्ट एशिया आणि साउथ एशियाचे प्रादेशिक संचालक रोनाल्ड हो, साऊथ एशियाचे सल्लागार राजेश भगत, वरिष्ठ प्रकल्प व्यवस्थापक झहीर मर्चंट यांच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अग्रिकल्चरच्या मुख्यालयास भेट दिली. याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी त्यांचे स्वागत केले. अध्यक्ष ललित गांधी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत द्विपक्षीय व्यापार संधींबाबत महत्त्वपूर्ण चर्चा झाली. सामंजस्य करार करण्याचे ठरले.

सुरवातीला महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती दिली. राज्यातील व्यापार, उद्योगांची माहिती देऊन महाराष्ट्र चेंबरने जागतिक स्तरावर व्यापार, उद्योग, कृषी उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात महत्वाची भूमिका असून अनेक देशातील चेंबर ऑफ कॉमर्स बरोबर सामंजस्य करार केले असल्याची माहिती दिली. तसेच द्विपक्षीय व्यापार उद्योगांना चालना देणे, त्यांचा विकास करणे, माहिती तंत्रज्ञानाची देवाणघेवाण करणे यासाठी हाँगकाँग ट्रेड डेव्हलपमेंट कौन्सिल व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स यांच्या होणाऱ्या सामंजस्य करारामुळे द्विपक्षीय व्यापार उद्योगाला चालना मिळेल. महाराष्ट्रातील व्यापार, उद्योगांना निर्यातीच्या संधी उपलब्ध होतील असा विश्र्वास अध्यक्ष ललित गांधी यांनी व्यक्त केला. हाँगकाँग ट्रेड डेव्हलपमेंट कौन्सिलच्या साउथेस्ट एशिया आणि साउथ एशियाचे प्रादेशिक संचालक रोनाल्ड हो यांनी हाँगकाँग ट्रेड डेव्हलपमेंट कौन्सिलच्या माध्यम ातून महाराष्ट्रातील व्यापार, उद्योगाच्या वृद्धीसाठी, राज्यातील कृषीमाल निर्यात या विषयी विविध संधी उपलब्ध होतील. महाराष्ट्र चेंबरच्या सहकार्याने व्यापार, उद्योगांच्या विकासासाठी संयुक्तरित्या काम करू असे सांगितले. सामंजस्य करार करण्यात येणार आहे. द्विपक्षीय व्यापार संधींबाबत महत्त्वपूर्ण चर्चा झाली. दोन्ही बाजूंच्या उद्योग क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यावर भर देण्यात आले. यामध्ये नवनवीन उद्योग, व्यापार कृषि आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील संधींवरही चर्चा करण्यात आली. हाँगकाँग ट्रेड डेव्हलपमेंट कौन्सिल व महाराष्ट्र चेंबरने आपले शिष्ट मंडळ पाठवावेत असे ठरविण्यात आले. या चर्चासत्रात वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, उपाध्यक्षा संगीता पाटील, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, उपाध्यक्ष संजय सोनवणे, उपाध्यक्ष शंकर शिंदे, व्यवस्थापन समिती विशेष निमंत्रित सदस्य कांतीलाल चोपडा उपस्थित होते.

# उद्योगासाठी जिल्ह्यात पोषक वातावरण

## पालकमंत्री आबिटकर : गुंतवणूक परिषदेत चार हजार १६० कोटींचे सामंजस्य करार




**कोल्हापूर, ता. १२ :** 'जिल्ह्यात उद्योग क्षेत्राला पोषक वातावरण आहे. त्यामुळेच जिल्ह्यातील गुंतवणुकीला महत्त्व आहे. येथील उद्योगवाढीसाठी जिल्ह्यातील सर्व उद्योजकांनी सहकार्य करण्याची आवश्यकता आहे. यातूनच जिल्ह्यात अधिकाधिक गुंतवणूक येईल', असा विश्वास पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज येथे जिल्हा गुंतवणूक परिषदेत व्यक्त केला. दिवसभरात परिषदेत १४७ उद्योग घटकांचे चार हजार १६० कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले.

पालकमंत्री आबिटकर म्हणाले, 'उद्योग क्षेत्राला पोषक वातावरण जिल्ह्यात आहे. शहरात आयटी पार्क उभारण्यासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार प्रयत्नशील आहेत. आयटी पार्कचा शासन निर्णय काढून या कामाला गती देण्यासाठी उद्योगमंत्री सहकार्य करतील.

जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम ही महत्त्वाकांक्षी योजना सुशिक्षित बेरोजगार युवक, युवतींना रोजगार, स्वयंरोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने ऑगस्ट २०१९ पासून उद्योग संचालनालयाने सुरू केल्याचे सांगितले.

आजच्या गुंतवणूक परिषद कार्यक्रमात चार हजार १६० कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले. यामध्ये एकूण आठ हजार ५५० रोजगार निर्मिती होणार आहे. त्यात प्रामुख्याने एक्सपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड इंजिनिअरिंग १२५ कोटी, अरविंद पाटील इंडिया लिमिटेड टेक्सटाईल १२५ कोटी, तेजस इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड फाउंड्री उद्योग ११५ कोटी, नेक्स्ट लाइव प्रायव्हेट लिमिटेड इंजिनिअरिंग १०५ कोटी व मे आरिहंत टेक्समो स्पिन टेक्स्टाईल १०५ कोटी, अशा उद्योग घटकांचा समावेश असल्याचे जाहीर करण्यात आले. दरम्यान, या जिल्हास्तरीय गुंतवणूकदार परिषदेत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासह अन्य संस्था सहभागी झाल्या होत्या.

दरम्यान, मागील आर्थिक वर्षात जिल्ह्याला बाराशे लाभार्थीचे उद्दिष्ट होते. तेथे १२२२ नवउद्योजकांना लाभ दिला. राज्यात उच्चांकी उद्दिष्टपूर्ती साध्य झाली. १२२२ लाभार्थ्यांना ७० कोटी ४७लाख रकमेचे अनुदान मंजूर केले. ३५ कोटी २२ लाखांचे अनुदान लाभार्थीना प्रत्यक्षात कर्ज रकमेसह दिले. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ांतर्गत योजना सुरुवातीपासून ३५५३ लाभार्थीना कर्ज मंजूर केले असून, १९९ कोटी ४१ लाखांचे अनुदान मंजूर केले असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले.




◆ महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या उत्तर महाराष्ट्र विभागीय कार्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना अध्यक्ष ललित गांधी

# नाशिक कुंभमेळ्याने महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल - नाम. ललित गांधी

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स विशेष प्रयत्नशील

**नाशिक** : नुकताच उत्तर प्रदेशमध्ये झालेल्या कुंभमेळ्यामुळे एक मोठी आर्थिक चालना तेथील अर्थव्यवस्थेला मिळाली हे आपण सर्वांनी अनुभवले आहे. नाशिकच्या कुंभमेळ्याचेही महत्व आपल्या संस्कृती व जीवनामध्ये विशेष असून त्यातून केवळ नाशिकचं नव्हे तर महाराष्ट्र राज्याच्या अर्थव्यवस्थेला शक्तिशाली चालना मिळेल असा विश्वास वाटतो. यादृष्टीने महाराष्ट्र चेंबर मध्ये विशेषत्वाने विचार चालू आहे. येत्या पंधरवाड्यामध्ये या अनुषंगाने सर्वंकष असे सादरीकरण केले जाणार असून त्याचा शासकीय व अन्य सर्व स्तरांवर सातत्याने पाठपुरावा केला जाईल अशी माहिती महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष व नामदार ललित गांधी यांनी दिली. ते महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र विभागीय कार्यालयाच्या ५३ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

नाशिकच्या कुंभमेळ्याला केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यातून व परदेशातूनही लोक येणार आहेत. सहाजिकच या कुंभमेळ्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण असे नियोजन करावे लागणार आहे. तसेच भविष्याचा विचार करूनही काही कायम स्वरूपी यंत्रणाही असावी लागेल. हा कुंभमेळा त्यामुळे एक मोठे आव्हान जसे आहे तसेच मोठी संधीही आहे. यादृष्टीने आपली जबाबदारी ओळखून महाराष्ट्र चेंबर आणि त्यांचे सर्व सभासद त्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य देतील असेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड एग्रीकल्चर च्या उत्तर महाराष्ट्र शाखेचा ५३ वा वाढदिवस अध्यक्ष ललित गांधी यांच्या व नाशिक मधील विविध व्यापारी औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.याप्रसंगी अध्यक्ष श्री ललित गांधी यांनी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याचा आढावा घेतला. रचनात्मक कार्यास प्राधान्य आर्थिक क्षेत्रामध्ये अनेकविध प्रश्न भेडसावत असतात. तसेच नेमके कोणते कार्य व प्रकल्प अंमलांत आणावे म्हणजे प्रगतीला विशेष चालना मिळेल याचाही विचार करावा लागतो. आणि नेमके याच बाबींचा विचार करून महाराष्ट्र चेंबर गेली अनेक वर्षे शासनाकडे त्याबाबतच्या नियोजनात्मक बाबी सादर करत असते.

उत्तर महाराष्ट्राच्या व खासकरून नाशिकच्या संदर्भात अशा अनेक बाबी चेंबरने हाताळल्या आहेत. हे कार्य यापुढेही असेच सुरु राहील अशीही ग्वाही त्यांनी दिली. व्यापारी व उद्योजकांमधील अंतरंगात व्यापार सतत वाढावा यासाठी नाशिकला बिझनेस फोरमची केलेली स्थापना त्याचाच एक भाग आहे. त्याची साखळी संपूर्ण महाराष्ट्रभर प्रत्येक जिल्ह्यातून पसरविली जाईल असेही त्यांनी सांगितले. उत्तर महाराष्ट्रासाठी महाराष्ट्र चेंबरने केलेल्या कार्याची माहिती दिली. महाराष्ट्र चेंबरने राज्यातील सर्व व्यापारी औद्योगिक क्षेत्राचे प्रश्न सोडविण्यासाठी व्यापारी औद्योगिक संघटना संवेद मोठ्या प्रमाणात काम केले आहे एलबीटी कर रद्द करणे प्लास्टिक बंदी बाबतचा मोठ्या निर्णय रद्द करणे कोरोना काळातील रिफंड मिळवून देणे यासारखे महत्त्वपूर्ण काम अलीकडच्या काळात केले आहेत. तसेच महाराष्ट्र चेंबर तर्फे उत्तर महाराष्ट्र शाखेसाठी मिळालेल्या जागेत उभारण्यात येत असलेल्या चेंबर भवनमध्ये व्यापारी औद्योगिक संघटनांना कार्यालय साठी जागा देण्यात येणार असल्याचे सांगितले.

उपाध्यक्ष संजय सोनवणे यांनी प्रास्ताविक करताना महाराष्ट्र चेंबरचे उत्तर महाराष्ट्रातील कार्याची भूमिका स्पष्ट करून येणाऱ्या कुंभमेळा व्यापार उद्योगाच्या दृष्टिकोनातून व नाशिकच्या विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्र चेंबर महत्त्वपूर्ण भूमिका बजावनार असल्याचे सांगितले.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरच्या मासिआ बिजनेस नेटवर्किंग फोरमचे नूतन पदाधिकारी तुषार श्रीवास्तव, अमित पवार, बाळासाहेब आंबरे, राहुल जैन यांचा अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. स्वागत उत्तर महाराष्ट्र शाखेचे चेअरमन अंजु सिंघल यांनी केले तर आभार प्रदर्शन को-चेअरमन भावेश मानेक यांनी केले. सूत्रसंचालन दत्ता भालेराव यांनी केले. मासिआ बिजनेस नेटवर्किंग फोरम ची माहिती राजाराम सांगळे यांनी दिली.

कार्यक्रमास महाराष्ट्र चेंबरचे माजी वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, माजी विश्वस्त विलास शिरोरे, निमाचे माजी अध्यक्ष धनंजय बेळे ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र फड नाईस चे अध्यक्ष रमेश वैश्य किरकोळ किराणा संघटनेचे अध्यक्ष एकनाथ अमृतकर, माजी अध्यक्ष अरुण जातेगावकर, शेखर दशपुते, रेशन दुकानदार संघटनेचे अध्यक्ष शांताराम क्षीरसागर, मिठाई संघटनेचे अध्यक्ष मनोज कोतकर आदींसह व्यापारी औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र शाखेचे चेअरमन अंजु सिंघल, को-चेअरमन भावेश मानेक, संजय राठी, कार्यकारिणी सदस्य हेमंत कांकरिया, रवी जैन, मनिष रावल, बाळासाहेब गुंजाळ, राजेंद्र कोठावदे, मिलिंद राजपूत, श्रीकांत पाटील आदिसह सर्व कार्यकारिणी सदस्य व विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.






◆ महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र विभागीय शाखा कार्यालय वर्धापन दिनानिमित्त संस्थापक अध्यक्षशेठ वालचंद हिराचंद व माजी अध्यक्ष पद्मश्री बाबुभाई राठी यांच्या प्रतिमेस अध्यक्ष ललित गांधी, माजी वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरवात करण्यात आली. याप्रसंगी उपाध्यक्ष संजय सोनवणे, कार्यकारीणी सदस्य रणजितसिंग आनंद, शाखा चेअरमन अंजु सिंघल, सल्लागार दिलीप साळवेकर, मालेगावचे सदस्य अजय शहा, को-चेअरमन भावेश माणेक, कार्यकारीणी सदस्य विजय वेदमुथा, मनिष रावल, कार्यकारीणी सदस्य दत्ता भालेराव.




◆ मार्गदर्शन करताना उत्तर महाराष्ट्र विभागाचे उपाध्यक्ष संजय सोनवणे, शाखा चेअरमन अंजु सिंघल, को-चेअरमन भावेश मानेक, ॲग्रीकल्चर कमिटीचे चेअरमन राजाराम सांगळे, मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरम को-चेअरमन दत्ता भालेराव




◆ महाराष्ट्र चेंबर च्या उत्तर महाराष्ट्र विभागीय कार्यालय वर्धापन दिनाच्या अध्यक्ष ललित गांधी व उपाध्यक्ष संजय सोनवणे यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देतांना आयमाचे सरचिटणीस प्रमोद वाघ, हर्षल बेळे, रविंद्र झोपे, मनिषरावल.




◆ अध्यक्ष ललित गांधी यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देतांना नाईसचे अध्यक्ष रमेश वैश्य, व्यवस्थापक दिनेश पाटील समवेत चेंबरचे पदाधिकारी व कार्यकारीणी सदस्य

# उत्तर महाराष्ट्र शाखेच्या वर्धापनदिनानिमित्त...




◆ अध्यक्ष ललितगांधी यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देतांना नाशिक धान्य किरकोळ किराणा संघटनेचे माजी अध्यक्ष शेखर दशपुते, अरूण जातेगांवकर समवेत उपाध्यक्ष संजय सोनवणे




◆ अध्यक्ष ललित गांधी व उपाध्यक्ष संजय सोनवणे यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देतांना लघु उद्योग भारतीचे अध्यक्ष निखिल तापडिया, नाईसचे अध्यक्ष रमेश वैश्य, मिठाई संघटनेचे अध्यक्ष मनोज कोतकर समवेत अजय शहा, दिपाली चांडक, राजेंद्र कोठावदे




◆ अध्यक्ष ललित गांधी यांना पुष्प गुच्छ देऊन शुभेच्छा देतांना माजी विश्वस्त श्री. व सौ विलास शिरोरे समवेत शाखा को-चेअरमन भावेश मानेक, शाखा चेअरमन अंजु सिंघल, को-चेअरमन संजय राठी, उपाध्यक्ष संजय सोनवणे, मिठाई असोसिएशनचे अध्यक्ष मनोज कोतकर




◆ अध्यक्ष ललितगांधी यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देतांना माजी वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, मालेगावचे सदस्य अजय शहा, प्रकाश बोकाडिया, उपाध्यक्ष संजय सोनवणे, कार्यकारीणी सदस्य विजय वेदमुथा, शाखा चेअरमन अंजु सिंघल, को-चेअरमन संजय राठी, भावेश मानेक.






◆ महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र विभागीय कार्यालय वर्धापन दिना च्या अध्यक्ष ललित गांधी व उपाध्यक्ष संजय सोनवणे यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देतांना नाशिक रिटेल क्लॉथ मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष नरेश पारख व सराफ असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश नवसे समवेत को-चेअरमन भावेश मानेक, नाशिक धान्य किरकोळ किराणा संघटनेचे माजी अध्यक्ष शेखर दशपुते.

# महाराष्ट्र चेंबर व्यापारी उद्योजकांच्या पाठीशी : नाम. ललित गांधी




◆ **अहिल्यानगर जिल्हा कंजूमर प्रॉडक्ट्स डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशन व किराणा व्यापारी असोसिएशन, राहुरी तालुका कंजूमर प्रॉडक्ट्स डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशन व राहुरी तालुका किराणा व्यापारी असोसिएशनतर्फे राहुरी येथे भव्य व्यापारी मेळावा प्रसंगी मार्गदर्शन करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष व राज्यमंत्री नामदार ललित गांधी**

**राहुरी** : अहिल्यानगर जिल्हा कंजूमर प्रॉडक्ट्स डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशन व किराणा व्यापारी असोसिएशन, राहुरी तालुका कंजूमर प्रॉडक्ट्स डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशन व राहुरी तालुका किराणा व्यापारी असोसिएशनतर्फे राहुरी येथे व्यंकटेश लॉन्स अँण्ड रिसॉर्ट येथे भव्य व्यापारी मेळावा संपन्न झाला.

मेळाव्याचे उद्घाटन महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष व राज्यमंत्री नामदार ललित गांधी, कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेशलाल सुराणा यांच्या हस्ते प्रमुख ऑल इंडिया कंजूमर प्रॉडक्ट डिस्ट्रीब्यूटर असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील पाटील, पुणे जिल्हा रिटेल व्यापारी संघ संस्थापक अध्यक्ष व पुणे जिल्हा कॅटचे अध्यक्ष सचिन निवंगुणे, कोथमीरे मसाले संगमनेरचे विवेक कोथमीरे यांच्या उपस्थितीत दिपप्रज्वलन करून व्यापारी मेळाव्याची सुरुवात करण्यात आली.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष व राज्यमंत्री नामदार ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती दिली. स्वातंत्र्यापूर्वी स्वदेशी व्यापारी उद्योजकांच्या हितासाठी १९२७ साली महाराष्ट्र चेंबरची स्थापना झाली. तेव्हापासून राज्यातील व्यापार, उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी महाराष्ट्र चेंबर अविरत कार्यरत आहे. प्लास्टिक बंदी, एलबीटी कर रद्द करणे, जीएसटी करातील व्यापाऱ्यांच्या अडचणी दूर करण्याचे महत्वपूर्ण काम केले. करोना काळातील उद्योजकांचे थकलेले अनुदान मिळवून देण्यात महाराष्ट्र चेंबरने महत्वपूर्ण भूमिका बजावली. राज्यासह देश–परदेशात राज्यातील उद्योजकांना बाजारपेठेत स्थान मिळवून दिले. बाजापेठेतील बदलत्या स्वरूपाला स्वीकारत इ –कॉमर्सच्या आव्हानाला तोंड देताना व्यापाऱ्यांनी नवीन पध्दतीचा अवलंब करावा. तसेच ई – कॉमर्सबाबत पॉलीसी नाही त्यासाठी केंद्र सरकारकडे महाराष्ट्र चेंबर पाठपुरावा करत असल्याचे सांगितले. तसेच महाराष्ट्र चेंबरचे सभासदत्व घेऊन व्यापाऱ्यांनी एकत्र यावे असे आवाहन महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष व राज्यमंत्री नामदार ललित गांधी यांनी केले.

याप्रसंगी धैर्यशील पाटील, सचिन निवगुणे, जीएसटी कर प्रणालीचे अधिकारी पांडुरंग ढगे, अभिजीत पाडेकर, अन्नसुरक्षा अधिकारी डॉ. प्रदीप पवार यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी व्यापारी व पत्रकारांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

स्वागत व प्रास्ताविक संतोष लोढा यांनी केले. सूत्रसंचालन स्वाती वाणी यांनी केले तर आभार राहुरी तालुका व्यापारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश पारख यांनी मानले. व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






◆ महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष व राज्यमंत्री नामदार ललित गांधी यांचा सत्कार करताना राहुरी तालुका कंझुमर प्रॉडक्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष संतोष लोढा तर दुसऱ्या छायाचित्रात मेळाव्याचे उद्धाटन करतांना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष व राज्यमंत्री नामदार ललित गांधी, कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेशलाल सुराणा, प्रमुख पाहुणे ऑल इंडिया कंजूमर प्रॉडक्ट डिस्ट्रीब्यूटर असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील पाटील, पुणे जिल्हा रिटेल व्यापारी संघ संस्थापक अध्यक्ष व पुणे जिल्हा कॅटचे अध्यक्ष सचिन निवंगुणे, कोथमीरे मसाले संगमनेरचे विवेक कोथमीरे.

# उद्योगांची दुहेरी कर जाचातुन सुटका करा, मार्केट सेस व व्यवसाय कर रद्द करावा - ललित गांधी

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सची राज्य सरकारकडे मागणी

**मुंबई** : महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासासाठी राज्य सरकार विविध धोरणे आखत आहे ही बाब स्वागतार्ह आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर नवीन गुंतवणुक येत आहे हे अभिनंदनीय आहे. मात्र राज्याच्या औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक वसाहतीतील उद्योगांना दुहेरी कराचा जाच सहन करावा लागत आहे. तरी ग्रामीण भागातील औद्योगिक वसाहतीमधील उद्योगांना ग्रामपंचायत व एमआयडीसी तर शहरी भागातील उद्योगांना नगरपालिका, महानगरपालिका व एमआयडीसी अशा दोन्ही यंत्राणांकडून करवसुली केली जाते ही करवसुली अन्यायकारक असुन तात्काळ रद्द करणे आवश्यक आहे. येत्या अर्थसंकल्पात हा कर रद्द करावा.

बाजार समितीचा कालबाह्य झालेला कायदा रद्द करावा, बाजार समिती मध्ये थेट शेतकर्यांसकडून येणार्याच शेतमालाव्यतिरीक्त अन्य सर्व प्रकारच्या मालावरील सेस रद्द करणे व्यापार विकासासाठी आवश्यक आहे तरी हा कर रद्द करण्याचा निर्णय येत्या अर्थसंकल्पात घ्यावा.

तात्पुरत्या कालावधीसाठी लागु केलेला व्यवसाय कर हा वर्षानुवर्षे चालुच आहे. ज्याचा नाहक त्रास व्यापारी, उद्योजक, व्यावसायिकांना सहन करावा लागत आहे. तरी हा कर यावर्षी रद्द करावा अशी आग्रही मागणीआहे.

त्याचबरोबर सोलर वीज वापराची मर्यादा खुली करावी. खाजगी जागेत उद्योग सुरू करण्यासाठी बिगरशेती आवश्यक नसल्याच्या शासन निर्णयात सुधारणा करावी. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दुकानगाळ्यांच्या भाडे आकारणीवर व्यवहार्य तोडगा काढावा. माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीतील गैरप्रकार थांबवावेत. व्यापारी आस्थापनांना एकच परवाना आवश्यक ठेवावा. अशा अन्य महत्वाच्या विषयावर सरकारने या अर्थसंकल्पात निर्णय घ्यावा अशी मागणी राज्याच्या व्यापार, उद्योग, कृषी व सेवा उद्योगाची शिखर संस्था असलेल्या 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' च्या वतीने अध्यक्ष ललित गांधी यांनी केली असुन यासंबंधीची निवेदने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना प्रेषित केली आहेत.

# उद्योजक, व्यापाऱ्यांना काहीही कमी पडू देणार नाही - उद्योगमंत्री उदय सामंत यांची ग्वाही

### महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्स्पोचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते भव्य उद्घाटन

### एक्स्पोला नागरिकांची प्रचंड गर्दी, देशभरातून व्यापारी, उद्योजकांचा सहभाग




**मुंबई :** उद्योजक, व्यापारीस्नेही सरकार आहे. त्यांच्यासाठी काहीही कमी पडू देणार नाही. उद्योगाला काय हवे आहे, हे सरकारला माहिती आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री ॲग्रीकल्चरने राज्याच्या विकासासाठी मोठी मदत केली आहे. भविष्यातही महाराष्ट्र चेंबरचे सहकार्य राहणारच आहे. त्यामुळे काळजी करु नका, उद्योग, व्यापाराला लागणाया सर्व सुविधा देऊन येत्या काही दिवसांत महाराष्ट्र एक क्रमांकांचे राज्य ठरेल, असा विश्वास उद्योग मंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केला. महाराष्ट्राच्या विकासातील पूर्वीचे सर्व अडथळे दूर केले जात आहेत. यापुढे बुलेट ट्रेन सारखा गतीने राज्याच्या विकासाची घौडदौड सुरु राहील, असा विश्वासही त्यांनी दिला.

राज्यातील व्यापाराला चालना देण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँण्ड ॲग्रीकल्चर, महाराष्ट्र सरकारचा उद्योग विभाग आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने ब्रांदा कुर्ला कॉम्प्लेक्स (बीकेसी) मुंबई येथे महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्स्पो (मायटेक्स) चा भव्य शानदार शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते झाला. त्यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत बोलत होते.

उद्योग मंत्री उदय सामंत म्हणाले, देशात महाराष्ट्र हे प्रगत राज्य आहे. या राज्यात उद्योगस्नेही राज्य शासन कार्यरत आहे. उद्योगासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा, सवलती व कुशल मनुष्यबळ येथे मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. मैत्री अंतर्गत एक खिडकी योजनेतून उद्योगांना सर्व परवाने देण्यात येत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र हे गुंतवणूकदारांचे आवडते ठिकाण आहे. आमचे सरकार हे सामान्य नागरिकांचे उद्योगांचे, विकासाचे ध्येय ठेवणारे सरकार आहे. राज्यात उद्योग वाढीसाठी मोठ्या संधी उपलब्ध आहेत. जास्तीत जास्त उद्योगांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी. राज्य शासनामार्फत त्यांना सर्वतोपरी सहकार्य केले जात आहे. त्यामुळे उद्योगांनी येथे यावे व गुंतवणूक करावी. दावोसमध्ये झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राने सुमारे १५ लाख ७० हजार कोटी रुपयांची









गुंतवणूक आणली आहे. या गुंतवणूकीत उद्योजकांनी मोठा विश्वास दाखविला आहे. या परिषदेत झालेले सामंजस्य करार केवळ कागदावर राहणार नाहीत. उद्योग, गुंतवणुकदारांना राज्य सरकारतर्फे सर्व सहकार्य दिले जात आहे. राज्य सरकार नेहमीच औद्योगिक विकासासाठी सोबत आहे. पुढील काळातही उद्योगांना लागणारे सर्व सहकार्य राज्य शासन करेल.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते उद्योग मंत्री उदय सामंत यांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, महाराष्ट्र चेंबरतर्फे राज्यातील व्यापार आणि उद्योगाला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले जात आहे. मायटेक्स देशभरातील उद्योजक आणि व्यापार्‍यांना व्यापारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी मायटेक्स एक्स्पो भरविले आहे.

महाराष्ट्र चेंबरने सरकारकडे मांडलेले सर्व प्रश्न मार्गी लावले आहेत. भविष्यातही चेंबरचे सर्व प्रश्न मार्गी लागतील. दावोसमध्ये झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत राज्य सरकारने १५ लाख ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणली. दरम्यान चेंबरच्या शतकमहोत्सव वर्षानिमित्त देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी यांना आमंत्रित करण्याची चेंबरची इच्छा चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडे व्यक्त केली. या मायटेक्समुळे महाराष्ट्रातील व्यापार, उद्योगाचा प्रचार, प्रचार होऊन पोषण वातावरण निर्माण होऊन देशात एक नंबरचे राज्य बनविण्यात महत्वपूर्ण ठरेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी यांनी आभार मानले. यावेळी महाराष्ट्र चेंबर चे उपाध्यक्ष श्रीकृष्ण परब, कांतीलाल चोपडा, संदीप भंडारी, महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारिणी सदस्य, व्यापारी, उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# व्यापार-उद्योगाला जागतिक बाजारपेठेत संधी मिळेल : रविंद्र मानगावे

## महाराष्ट्र चेंबर आणि युरोप इंडिया चेंबर ऑफ कॉमर्स यांच्यामध्ये सामंजस्य करार





**◆ महाराष्ट्र चेंबर आणि युरोप इंडिया कॉमर्स यांच्यामध्ये सामंजस्य कराराप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र मानगावे, युरोप इंडिया कॉमर्सचे अध्यक्ष अमित लाट, महाराष्ट्र चेंबरच्या ट्रस्ट बोर्ड चेअरमन आशिष पेडणेकर, मुंबई विभागाचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, शमिका नाडकर्णी, कैलास चांडक, प्रतीक सोनावणे**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व यूरोप इंडिया चेंबर ऑफ कॉमर्स यांच्यामध्ये महाराष्ट्रातील व्यापार उद्योगाला चालना देणे, जागतिक स्तरावर बाजारपेठ उपलब्ध करून देणे, तंत्रज्ञान व माहितीची देवाण-घेवाण करणे यासाठी शुक्रवार दि. २५ एप्रिल २०२५ रोजी चेंबरच्या मुख्यालयात सामंजस्य करार करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्रचे वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र मानगावे यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती देऊन स्वातंत्र्यपूर्व काळापासून महाराष्ट्र चेंबरने राज्यातील व्यापार उद्योगाला जागतिक स्तरावर बाजारपेठ व जागतिक स्तरावरील व्यापार उद्योगांना राज्यातील व्यापार उद्योगात सहभागी करून घेण्यासाठी केलेल्या कार्याची माहिती दिली. तसेच विविध देशातील चेंबर ऑफ कॉमर्स बरोबर झालेल्या सामंजस्य करारांची माहिती दिली. युरोप इंडिया कॉमर्सच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यातील व्यापार उद्योगाला निश्चितच चालना मिळेल. राज्यातील व्यापार उद्योगाला जागतिक बाजारपेठेतील संधी मिळतील असा विश्वास व्यक्त केला.

सुरवातीलामहाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे यांनी युरोप इंडिया कॉमर्सचे अध्यक्ष अमित लाट व त्यांच्या सहकाऱ्यांचे स्वागत केले. याप्रसंगी यूरोप इंडिया चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष अमित लाट यांनी महाराष्ट्र चेंबर कार्याची माहिती घेऊन चेंबरच्या कार्याचे कौतूककेले. दोन्ही चेंबरच्या माध्यमातून व्यापार-उद्योगांचा विकास करणे, बाजारपेठ उपलब्ध करून देणे, नेटवर्किंग करणे यासह विविध उपक्रम राबविण्यात येतील. त्यांचा फायदा व्यापार उद्योगाला निश्चित होईल असे सांगितले.या करारादरम्यान यूरोप इंडिया चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष अमित लाट, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँण्ड ॲग्रिकल्चरचे वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, ट्रस्ट बोर्ड चेअरमन आशिष पेडणेकर, मुंबई विभागाचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, शमिका नाडकर्णी, कैलास चांडक, प्रतीक सोनावणे हे उपस्थित होते.

# उद्योगमंत्री उदय सामंत यांचे महाराष्ट्र चेंबरच्या जळगाव विकास परिषदेतील दिलेले आश्वासन पूर्णत्वाकडे : संगिता पाटील

## जळगावला आयटी उद्योगास २०० एकर जागा राखीव ठेवणार




◆ **जिल्ह्यातील उद्योजकांच्या शिष्टमंडळाची उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या समवेत प्रसंगी उपस्थित महाराष्ट्र चेंबर च्याउपाध्यक्ष संगिता पाटील, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य महेंद्र रायसोनी, अरविंद दहाड, अश्विन परदेशी, किरण बच्छाव आदी.**

**जळगाव** : जळगाव जिल्ह्यातील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर सातत्याने शासनस्तरावर पाठपुरावा करत आहे. याच पार्श्वभूमीवर १६ फेब्रुवारी २०२३ रोजी अध्यक्ष श्री. ललित गांधी यांच्या पुढाकाराने जळगाव जिल्हा विकास परिषद घेण्यात आली होती. या बैठकीनंतरही महाराष्ट्र चेंबरने शासनस्तरावर सातत्याने प्रयत्न सुरू ठेवले. या प्रयत्नांना यश येत जळगाव जिल्ह्यात नवीन एमआयडीसी विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, यामध्ये आयटी उद्योगासाठी २०० एकर जागा राखीव ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली. या निर्णयाचे महाराष्ट्र चेंबरच्या उपाध्यक्ष संगिता पाटील यांनी स्वागत केले असून, जळगाव विकास परिषदेत दिलेले आश्वासन पूर्णत्वास जात असल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री आणि ॲग्रीकल्चरच्या शिष्टमंडळाने आमदार सुरेश भोळे यांच्या नेतृत्वाखाली उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेतली. यावेळी चेंबरच्या उपाध्यक्ष संगिता पाटील, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य किरण बच्छाव, महेंद्र रायसोनी, अरविंद दहाड, अश्विन परदेशी, तसेच जळगाव एमआयडीसीचे अधिकारी सुनील घाटे, श्री. पाटील, उद्योग भारतीचे अध्यक्ष संतोष इंगळे, प्रमोद संचेती, रवी फालक, आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आणि महापालिका आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सहभाग घेतला.

जळगावच्या औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. सध्या महापालिका आणि एमआयडीसीकडून वेगवेगळे कर आकारले जात आहेत. यासंदर्भात शासन पातळीवर एकत्रित कर लागू करण्याबाबत विचार सुरू असून, तोपर्यंत उद्योजकांवर सक्तीने कर वसूल करू नये किंवा कंपन्यांवर सील करण्याची कारवाई करू नये, असे निर्देश महापालिका आयुक्तांना देण्यात आले. आरडीएसएस योजनेअंतर्गत नवीन सबस्टेशन प्रस्तावित असून, चार प्लॉट आवश्यक आहेत. यातील दोन प्लॉट तातडीने उपलब्ध करून देण्यात आले असून, उर्वरित दोन प्लॉटसाठी प्रक्रिया सुरु आहे.

एमआयडीसी मध्ये प्रलंबित असलेला फायर स्टेशनचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला असून, एमआयडीसी स्वतः हे फायर स्टेशन चालवणार आहे. या निर्णयांमुळे जळगाव जिल्ह्यातील उद्योग, व्यवसाय आणि रोजगाराच्या संधींना गती मिळणार आहे.

### महिला उद्योजकांसाठी सुवर्णसंधी

महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी उद्योगमंत्री उदय सामंत यांनी जळगावच्या औद्योगिक क्षेत्रात महिलांसाठी काही जागा राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

या निर्णयामुळे महिला उद्योजकांना व्यवसाय सुरू करण्यासाठी विशेष सवलती आणि सुविधा मिळणार असून, उद्योग क्षेत्रात महिलांची संख्या वाढवण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. जळगाव जिल्ह्यातील महिला उद्योजकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संगिता पाटील यांनी केले.






## International Women's Day...

International Women's Day program to the Woman Entrepreneurs for the world hosted by Women Entrepreneurs Committee of Maharashtra Chamber . We were honored to have the presence of esteemed guests, including the Consul, Moderator, Vice president,WEC Chairperson& Member who support the mission of advancing women in entrepreneurship. The program was filled with panel discussions, networking opportunities, and inspiring stories that highlighted the impact women entrepreneurs are making in various industries.

It was a powerful reminder that when women rise, communities, businesses, and economies thrive. A heartfelt thank you to everyone who join us.Let's continue to uplift, inspire, and create opportunities for women around the world. Together, we are unstoppable!

## नावीन्य, तंत्रज्ञान आणि उद्योजकतेच्या माध्यमातून प्रगतीला गती : सौ. संगिता पाटील

### मासिआच्या सहकार्याने जळगाव येथे जी. एच. रायसोनी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न









**जळगाव :** नावीन्य, तंत्रज्ञान आणि उद्योजकता हे कोणत्याही अर्थव्यवस्थेच्या विकासाचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. हे घटक केवळ आर्थिक वाढीला चालना देत नाहीत, तर समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात परिवर्तन घडवतात आणि व्यक्तींना नवनिर्मितीची संधी देतात, असे प्रतिपादन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर (मासिआ)च्या उपाध्यक्षा सौ. संगिता पाटील यांनी आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी केले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर व स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्क यांच्या सहकार्याने जळगाव येथे जी. एच. रायसोनी महाविद्यालयातील मॅनेजमेंट डिपार्टमेंटतर्फे 'इनोव्हेशन, टेक्नोलॉजी आणि उद्योजकता'या विषयावर चौथी आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न झाली. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्कूल ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंटचे अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, अमेरिकेतील स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्कचे प्रा. क्रिस्टोफर स्कॅल्झो यांची प्रमुख उपस्थिती होती. आंतरराष्ट्रीय परिषदेच्या चेअरमन व जी. एच. रायसोनी इस्टिट्यूटच्या संचालिका प्रा. डॉ. प्रिती अग्रवाल, आणि आंतरराष्ट्रीय परिषदेचे को-चेअरमन प्रा. डॉ. संजय शेखावत उद्घाटनप्रसंगी उपस्थित होते.

सौ. संगिता पाटील म्हणाल्या की, उद्योजक हे परिवर्तनाचे वाहक असून त्यांच्या नवकल्पनांमुळेच अर्थव्यवस्था बळकट होते. आज अनेक नवोदित उद्योजक छोट्या कल्पनांपासून मोठ्या व्यवसायांची उभारणी करत आहेत. उद्योजकता ही केवळ व्यवसाय सुरू करण्यासाठी नाही, तर समस्यांचे निराकरण करण्यासाठी, समाजावर सकारात्मक प्रभाव टाकण्यासाठी आणि नव्या संधी निर्माण करण्यासाठी आहे. प्रा. अनिल डोंगरे यांनीही बदलत्या तंत्रज्ञानाचा वेग स्वीकारण्याचे महत्त्व अधोरेखित केले. ज्यांनी स्वतःला अद्ययावत केले, त्यांनाच नवीन संधी मिळतात. त्यामुळे तंत्रज्ञानातील बदलांना सामोरे जाण्यासाठी प्रत्येकाने नवनवीन कौशल्ये शिकण्यास तयार राहिले पाहिजे असे प्रा. क्रिस्टोफर स्कॅल्झो यांनी सांगितले. ही परिषद उद्योग, विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाचा मंच ठरली असून, नाविन्य, तंत्रज्ञान आणि उद्योजकतेच्या माध्यमातून नव्या संधी कशा तयार करता येतील, यावर चर्चा करण्यात आली.

# नवीन उद्योग येण्यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण करू - नाम. ललित गांधी

## उद्योगांमुळे रोजगार निर्मिती, आर्थिक व पायाभूत विकास होतो



◆ **महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अग्रिकल्चरचे अध्यक्ष व जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष (राज्यमंत्री) नाम. ललित गांधी यांचा सत्कार करतांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रादेशिक अधिकारी दिपक पाटील, समवेत कार्यकारी अभियंता जयवंत पवार.**

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यामध्ये महिंद्रा ग्रुपच्या विस्तारीकरणासाठी जागेची गरज व त्याबाबत असलेल्या अडचणी, उद्योगांसाठी जागा मिळण्यास होणारा विरोध या विषयावर चर्चा होऊन जिल्ह्यामध्ये नवीन उद्योग येण्यासाठी सकारात्मक वातावरण तयार करण्यात यावे, नवीन उद्योग आल्यास रोजगार निर्मिती, शहर व जिल्ह्याचा विकास होतो, आर्थिक विकास व पायाभूत विकास होण्यास चालना मिळते. तसेच राज्याचा व देशांच्या विकासात भर पडते. त्यासाठी उद्योग विकासाला चालना मिळावी, उद्योगांना जागा मिळावी या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे असून महाराष्ट्र चेंबरच्या पुढाकाराने निमा, आयमा व सर्व औद्योगिक संघटनांसमवेत महाराष्ट्र चेंबर सकारात्म क वातावरण तयार करण्यासाठी प्रयत्नशील राहील असे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष व जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष (राज्यमंत्री) नाम. ललित गांधी अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अग्रिकल्चरचे अध्यक्ष व जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष (राज्यमंत्री) नाम. ललित गांधी यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नाशिक कार्यालयास भेट दिली. याप्रसंगी नाशिक जिल्ह्यात उद्योगांसाठी उपलब्ध जागा व नवीन औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी सुरु असलेल्या प्रक्रियेची माहिती प्रादेशिक अधिकारी दिपक पाटील यांच्याकडून जाणून घेतली. उद्योगांना जागा उपलब्ध करून देण्यास, उद्योजकांच्या अडचणी सोडविण्यासाठी उद्योजकांना सहकार्य करावे असे सांगितले.

सुरवातीला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रादेशिक अधिकारी दिपक पाटील यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अग्रिकल्चरचे अध्यक्ष व जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष (राज्यमंत्री) नाम. ललित गांधी यांचा सत्कार व स्वागत केले. तसेच नव्याने पदभार स्वीकारलेल्या प्रादेशिक अधिकारी दिपक पाटील यांचा सत्कार अध्यक्ष ललित गांधी यांनी केला.

याप्रसंगी उपाध्यक्ष संजय सोनवणे, माजी उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, विजय बेदमुथा, निमा अध्यक्ष आशिष नहार यांनी चर्चेत सहभाग घेऊन उद्योगांना जागा मिळणे हि गरज असून जागा मिळण्यास विरोध होऊ नये त्यासाठी एकत्रित व सकारात्मक प्रयत्न करण्यात येतील असे सांगितले. याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष संजय सोनवणे, माजी उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, विजय बेदमुथा, कृषी व ग्रामविकास समितीचे चेअरमन राजाराम सांगळे,महाराष्ट्र चेंबरचे उत्तर महाराष्ट्र शाखा को चेअरमन भावेश मानेक, संजय राठी, निमाचे उपाध्यक्ष के एल राठी, खजिनदार राजेंद्र वडनेरे, कार्यकारणी सदस्य हेमंत कांकरिया, श्रीधर व्यवहारे, श्रीकांत पाटील, रतन पडवळ, कैलास पाटील, सचिन कंकरेज, सहायक सचिव अविनाश पाठक आदींसह उद्योजक उपस्थित होते.

# महाराष्ट्र चेंबरच्या पाठपुराव्याला यश - उद्योगमंत्री उदय सामंत यांचे सकारात्मक निर्णय



महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष संजय सोनवणे यांच्या मार्गदर्शनखाली व आमदार हिरामण खोसकर यांच्या सहकार्याने शाखा को-चेअरमन संजय राठी, कार्यकारिणी सदस्य हेमंत कांकरिया, रतन पडवळ यांच्या शिष्टमंडळाने इगतपुरी नाशिक दरम्यान महिंद्रासह नवीन उद्योगांसाठी जागा उपलब्ध करून द्यावी यासाठी उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन मागणी केली. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सकारात्मक प्रतिसाद देत इगतपुरी नाशिक दरम्यान नवीन उद्योगांसाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल. पुढच्या २ दिवसात नाशिक दौरा करून पाहणी करणार असल्याचे आश्वासन महाराष्ट्र चेंबरच्या शिष्टमंडळाला होते. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिलेले आश्वासन पाळत नाशिकला जिल्हाधिकारी कार्यालयात एमआयडीसी, महानगरपालिका, महावितरण कंपनी व शासकीय अधिकारी आणि विविध औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यां समवेत बैठक घेतली.

नाशिकमध्ये मोठ्या उद्योगासाठी ४०० एकर जमीन संपादनाचा निर्णय, आडवण येथे प्रस्तावित उद्योग प्रकल्पासाठी जमिनीच्या सर्वेक्षणास मंजुरी,कुंभमेळा काळात 'टेंट सिटी' उभारण्याचा निर्णय, आय टी पार्क साठी ४० एकर जमीन देण्याचा निर्णय, अक्राळे येथे 'प्लग अँड प्ले' प्रकारच्या लघुउद्योगांसाठी १० एकर जागा राखीव, फ्लॅटेड बिल्डिंग सुविधा निर्माणासाठी अडीच कोटींचा निधी मंजूर, औद्योगिक वसाहतींमध्ये काँक्रीट रस्त्यांचे काम जलदगतीने करण्याचे निर्देश उद्योगमंत्री उदय सामंत यांनी अधिकाऱ्यांना दिले. याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारिणी सदस्य सचिन शहा, मिलिंद राजपूत, चेंबरच्या फोरम ऑफ इंडस्ट्री असोसिएशन समितीचे चेअरमन व निमाचे अध्यक्ष आशिष नहार, सिव्हिल एव्हिएशन समितीचे चेअरमन मनिष रावल यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या निर्णयाचे स्वागत करत दिलेल्या आश्वासनानुसार नाशिकला बैठक घेऊन उद्योगांना जागा देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतल्याबद्दल आभार व्यक्त केले. याप्रसंगी उद्योगमंत्री उदय सामंत, आमदार सौ. सीमा हिरे, जिल्हाधिकारी जलज शर्मा, महानगरपालिका आयुक्त मनिषा खत्री, एमआयडीसी प्रादेशिक अधिकारी दिपक पाटील, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संदिप पाटील, कार्यकारी अभियंता जयवंत पवार, अधिक्षक अभियंता झांजे शाखा को-चेअरमन संजय राठी, कार्यकारिणी सदस्य हेमंत कांकरिया, रतन पडवळ आदिसह विविध विभागाचे अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

# उद्योग क्षेत्रात येणाऱ्या अडचणीसंदर्भात बैठक संपन्न

मंगळवार दि. २५ मार्च २०२५ रोजी मंत्रालयात उद्योग विभागाचे सह सचिव डॉ. श्रीकांत पुलकुंडवार यांच्या समवेत महाराष्ट्र चेंबरच्या प्रतिनिधींची बैठक झाली. या बैठकीत उद्योग क्षेत्रात येणाऱ्या अडचणी, एमआयडीसीच्या प्लॉट वाटप धोरण, अग्निशमन विभाग आणि उद्योग विभागासंबंधी मुद्दे, मुद्रा कर्ज यांसारख्या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरच्या बारामती शाखा कार्यालयाचे चेअरमन शरद सूर्यवंशी यांनी डॉ. श्रीकांत पुलकुंडवार यांचा महाराष्ट्र चेंबरचे संस्थापक अध्यक्ष शेठ वालचंद हिराचंद यांचे पुस्तक देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

# नाशिकच्या कुंभमेळासाठी भरीव निधी आणणार - खास. राजाभाऊ वाजे




नाशिकच्या कुंभमेळ्यासाठी केंद्र सरकारकडून भरीव निधी आणणार आहे. तसेच नाशिकच्या सर्वांगीण विकासासाठी व्यापार, उद्योग कृषी सेवा क्षेत्र यांच्या अडचणी, प्रश्न आगामी संसदेच्या अधिवेशनात मांडून सोडविण्यात येईल. असे आश्वासन सर्व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना दिले.

खासदार राजाभाऊ वाजे यांच्या समवेत महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स निमा, आयमा, मोटर मर्चंट असोसिएशन, नाशिक धान्य किरकोळ किराणा संघटना, ट्रान्सपोर्ट असोसिएशन, हार्डवेअर अँड पेंट्स मर्चंट असोसिएशन स्पेअर पार्ट मर्चंट असोसिएशन, सिमेंट मर्चंट असोसिएशन आदींसह विविध व्यापारी औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसमवेत महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र शाखा कार्यालयात बैठक संपन्न झाली.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष संजय सोनवणे कृषी व ग्राम विकास समितीचे चेअरमन राजाराम सांगळे पर्यटन समितीचे चेअरमन दत्ता भालेराव, कुंभमेळा समितीचे चेअरमन सचिन शहा, नाइसचे अध्यक्ष रमेश वैश्य , आयमा चे माजी अध्यक्ष ज्ञानेश्वर गोपाळे, राजेंद्र पानसरे, गोविंद झा, उमेश कोठावदे, क्रेडाईचे माजी अध्यक्ष कुणाल पाटील, तुषार संकलेच्या, ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष सैनी, शंकर धनवटे, बजरंग शर्मा, नाशिक धान्य किरकोळ किराणा संघटनेचे अध्यक्ष एकनाथ अमृतकर, संतोष राय,माजी अध्यक्ष शेखर दशपुते, कैलास चावला आदींसह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी विमानसेवा, ओझर विमानतळ परिसराच्या २० किलोमीटरवर बांधकामास बंदी, नाशिकरोड रेल्वे स्टेशन विकास, रेल्वेसेवा, समृद्धी महामार्ग व राष्ट्रीय महामार्ग डबल टोल, आडगाव येथील लॉजिस्टिक पार्क सुरू करणे, आयटी पार्क मध्ये मोठा आयटी उद्योग आणणे, ट्रक टर्मिनल्स, वंदे भारत रेल्वेची वेळ बदलणे, नाशिक पुणे रेल्वे सेवा, सिमेंट आणि टायर व स्पेअर पार्ट वरील जीएसटी कमी करणे, क्विक कॉमर्स चे वाढते वर्चस्व, किरकोळ किराणा दुकानदारांना प्लास्टिक पॅकिंग साठी स्वतंत्र परवाना घेणे, फूड लायसन्सचे नियम व लायसनची मर्यादा १२ लाखाहून वाढवून २५ ते ३० लाख करणे, प्लास्टिक वापरावर किरकोळ किराणाला होणारा दंड, घरांच्या किमतीची मर्यादा ४५ लाखाहून ७५ लाख करणे, ग्राहकांना घर खरेदीवर एक टक्का जीएसटी आकारणे, एनडीसीसी बँक उर्जित अवस्थेत आणणे,औद्योगिक वसाहतीतील पायाभूत सोयी सुविधा यासह विविध प्रश्न संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी खासदार राजाभाऊ वाजे यांच्या समोर मांडले. चर्चेत सहभाग घेत मनीष रावल, हेमंत कांकरिया सुमित बोरा, राजाराम सांगळे, एकनाथ अमृतकर, कुणाल पाटील, तुषार संकलेचा, सैनी, शंकर धनवटे, श्रीधर व्यवहारे, निरंजन शहा आदींसह विविध प्रश्न मांडले.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारिणी सदस्य संदीप सोमवंशी, वेदांशू पाटील, डॉ. सोनल दगडे, रवी जैन, राजेंद्र कोठावदे, रामचंद्र जोशी, रतन पडवळ, अशोक तापडिया, संजय लुणावत, श्रीकांत पाटील, साहिल न्याहारकर, अभिजित चांदे, शिवाजी आव्हाड, सल्लागार दिलीप साळवेकर, सहायक सचिव अविनाश पाठक आदींसह व्यापारी उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उत्तर महाराष्ट्रात जिल्हा निहाय इज ऑफ डुइंग बिझिनेस अंतर्गत उद्योग-व्यापार समिती स्थापन करणार : दत्तात्रय कराळे, विशेष पोलिस महानिरीक्षक



नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांच्या समवेत उत्तर महाराष्ट्रातील व्यापार-उद्योग क्षेत्राच्या विविध अडचणींसंदर्भात बैठक संपन्न झाली. उत्तर महाराष्ट्रात जिल्हा निहाय इज ऑफ डुइंग बिझिनेस अंतर्गत उद्योग व्यापार समिती स्थापन करण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांनी दिला. तसेच लवकरच उत्तर महाराष्ट्रातील सर्व व्यापारी, औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेणार असल्याचे सांगितले. उद्योग व्यापार समिती स्थापन झाल्यावर व्यापार उद्योग क्षेत्राच्या समस्यांचे निराकरण करण्यास मदत होईल.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री चे उपाध्यक्ष संजय सोनवणे व कृषी ग्रामविकास समितीचे चेअरमन राजाराम सांगळे यांनी नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांची भेट घेतली.

# सर्व संघटनांशी समन्वय करून नाशिकचा विकास निश्चित चांगला करू - आयुक्त डॉ. माणिक गुरसळ



नाशिकचा विकास होत असतांना व्यापारी, उद्योजक, सर्वसामान्य नागरीक सर्वांचा सहभाग असणे आवश्यक आहे. रस्ते, वीज, पाणी, पायाभूत सुविधा यासह आवश्यक सुविधा उपलबद्ध करून देणे हि शासनाची जबाबदारी असली तरी सर्वांचा सहभाग व सूचना मिळाल्यास विकास अधिक चांगला होईल. त्यांनी त्यांच्या प्रयागराज येथील दौऱ्या विषयी माहिती देताना पुढच्या कुंभमेळ्यात एनएमआरडीएची भूमिका महत्वाची असेल. सर्व संघटनांशी समन्वय करून नाशिकचा विकास निश्चित चांगला करू असे नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नाशिकचे आयुक्त डॉ. माणिक गुरसळ यांनी नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक व भविष्यातील नाशिक याविषयी मार्गदर्शन केले. तसेच आगामी कुंभमेळाव्याने नाशिक येथे खूप मोठ्या प्रमाणावर उद्योग व्यवसाय यांची भरभराट होणार आहे या साठी सर्व व्यापार उद्योग कृषी व्यवसायिकांनी या संधीचा फायदा घेणे अपेक्षित आहे, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अग्रिकल्चर तर्फे नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक व भविष्यातील नाशिक याविषयावर चर्चासत्र बिझनेस बे, ४९, ५ वा मजला, श्रीहरी कुटेमार्ग, मुंबईनाका येथे संपन्न झाले.

याप्रसंगी नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नाशिकचे आयुक्त डॉ. माणिक गुरसळ, निमाचे नव निर्वाचित अध्यक्ष आशिष नहार यांचा पुष्पगुच्छ, शाल देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण चे नवनियुक्त आयुक्त डॉ. माणिक गुरसळ, महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष संजय सोनवणे, चेंबर भवन समितीचे चेअरमन कांतीलाल चोपडा, शाखा चेअरमन अंजु सिंघल, को–चेअरमन भावेश मानेक, निमाचे अध्यक्ष आशिष नहार, स्किल सिटी नाशिकचे प्रमुख जितेंद्र ठक्कर उपस्थित होते. स्वागत कांतीलाल चोपडा यांनी केले व डॉ. माणिक गुरसळ यांचा परिचय करून दिला. राज्याच्या व्यापार, उद्योगाच्या विकासात महाराष्ट्र चेंबर भूमिका महत्वाची असल्याचे सांगितले.

प्रास्ताविकात उपाध्यक्ष संजय सोनवणे केले

को–चेअरमन संजय राठी, राजाराम सांगळे, मिलिंद राजपूत, रतन पडवळ, मनीष रावल, रंजितसिंग आनंद, मंदार वाईकर,संदिप सोमवंशी, दीपाली चांडक, गौरव ठक्कर, लघुउद्योग भारतीचे अध्यक्ष निखिल तापडिया, कार्यकारिणी सदस्य आयमाचे सरचिटणीस प्रमोद वाघ, कॉम्प्युटर असोसिएशनचे अध्यक्ष राजेश भावसार, विनायक माळी, पुरुषोत्तम देशपांडे, सुहास सराफ, योगेश दुसाने, डॉ. उमेश शर्मा, आदिंसह व्यापारी उद्योजक उपस्थित होते.





◆ **महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष ललित गांधी यांनी आज सोमवार दि. २८ एप्रिल रोजी कोल्हापूर, सांगली, इचलकरंजी दौऱ्यानिमित्त आलेले केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री श्री गिरीराज सिंह यांची भेट घेऊन त्यांचे स्वागत केले, व चेंबरच्या कामकाजा संबंधी चर्चा केली. या भेटीमध्ये पश्चिम महाराष्ट्रचे उपाध्यक्ष रमाकांत मालु, गव्हर्निंग काउन्सिल सदस्य रमेश अरवाडे उपस्थित होते. विशेषता: वस्त्रोद्योग समितीच्या माध्यमातून या क्षेत्राच्या विकासासाठीच्या विविध उपक्रमांची चर्चा करून वस्त्रोद्योगासंबंधी लवकरच राष्ट्रीय परिषद घेणार असल्याची माहिती देऊन सदर परिषदेच्या उद्घाटनाचे आमंत्रण श्री गिरीराज सिंह यांना दिले.**

# चेंबरच्या महिला क्लस्टरसाठी जागा उपलब्ध करून देऊ - दिपक पाटील




महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी दिपक पाटील यांची महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँन्ड ॲग्रीकल्चर चे उपाध्यक्ष संजय सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने भेट घेतली. याप्रसंगी प्रादेशिक अधिकारी दिपक पाटील यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. तसेच नाशिक जिल्ह्यातील औद्योगिक विकासाबाबत चर्चा व सूचना करण्यात आल्या. याप्रसंगी महाराष्ट्र चेंबर तर्फे उभारण्यात येत असलेल्या महिला क्लस्टर साठी राजूर बाहुला औद्योगिक क्षेत्रात जागा देऊ असे आश्वासन शिष्टमंडळाला प्रादेशिक अधिकारी दिपक पाटील यांनी दिले.

सुरवातीला उपाध्यक्ष संजय सोनवणे यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती दिली. तसेच उत्तर महाराष्ट्र व नाशिक जिल्ह्यात व्यापार उद्योगाच्या विकासा साठी चेंबर करत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

आयटी उद्योगांसह मोठे उद्योग नाशिकमध्ये यावे या साठी चेंबर ऑफ कॉमर्सचे तर्फे सर्व ते सहकार्य राहतील अशी ग्वाही दिली. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सुद्धा या साठी प्रयत्न करावे असे सांगितले. उद्योगांसाठी पोषक वातावरण व पायाभूत सुविधा, मनुष्यबळ उपलब्ध असल्याची माहिती दिली.नाशिक जिल्ह्यात उद्योगांसाठी जागा कमी पडत असून सिन्नर, वाडीवऱ्हे, घोटी, इगतपुरी येथे जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणीही केली.

सद्य परिस्थितीत औद्योगिक वसाहती मध्ये ज्यात प्रामुख्याने रस्ते, ड्रेनेज ,पाणी , वीज पुरवठा या संदर्भात अनेक समस्या आहेत त्यावर तातडीने उपाय योजना राबविण्यात याव्या अशी विनंती करण्यात आली.

मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट समृद्धी महामार्ग या लगत प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रात नाशिक जिल्ह्यातून जाणाऱ्या या महामार्गा लगत आय टी, ऐ आय क्षेत्रात काम करणाऱ्या मुंबई , नवी मुंबई येथील काम करणाऱ्या मोठ्या कंपनी यांना जागा उपलब्ध करून त्यांना विस्तार करण्यासाठी आमंत्रित करावे अशी मागणी केली आणि यात चेंबर ऑफ कॉमर्सचे तर्फे सर्व पाठपुरावा करण्यात येईल या विषयी आश्वासित केले.

चर्चेत व्यवस्थापन समितीचे निमंत्रित सदस्य विजय वेदमुथा, कांतीलाल चोपडा, कृषी व ग्रामविकास समितीचे चेअरमन राजाराम सांगळे यांनी सहभाग घेतला व नवीन उद्योग येण्यासाठी विविध सूचना केल्या.

याप्रसंगी कृषी व ग्रामविकास समितीचे चेअरमन राजाराम सांगळे, व्यवस्थापन समितीचे निमंत्रित सदस्य विजय वेदमुथा, कांतीलाल चोपडा, एव्हिएशन समितीचे चेअरमन मनिष रावल उपस्थित होते.

## भावपूर्ण श्रद्धांजली



महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर च्या माजी उपाध्यक्ष शेठ वालचंद हिराचंद यांच्या पुतणी **श्रीमती शरयू दप्तरी** यांचे दुःखद निधन झाले आहे! चेंबरचे पदाधिकारी, सदस्य व संपूर्ण महाराष्ट्र चेंबर परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!



महाराष्ट्र चेंबरचे सदस्य व उत्तर महाराष्ट्र विभागाचे शाखा चेअरमन अंजु सिंघल यांच्या मातोश्री **श्रीमती सुधारानी** यांचे निधन झाले. महाराष्ट्र चेंबर तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.



महाराष्ट्र चेंबरचे सदस्य व उत्तर महाराष्ट्र शाखा कार्यालयाचे को-चेअरमन भावेश मानेक यांच्या मातोश्री **श्रीमती जयश्रीबेन मनहरलाल माणेक** (वय ८०) यांचे दि.१८ एप्रिल २०२५ रोजी निधन झाले. महाराष्ट्र चेंबरतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली !

# जळगाव एमआयडीसीला विशेष दर्जासाठी पाठपुरावा - ललित गांधी

**जळगाव :** जळगाव एमआयडीसीला विशेष दर्जा मिळवून देण्यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून हा विषय मार्गी लावू, असे प्रतिपादन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले.

जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेल्या श्री. ललित गांधी यांनी अजिंठा शासकीय विश्रामगृह येथे आयोजित बैठकीत जिल्ह्यातील उद्योगवाढीबाबत सखोल चर्चा केली. बैठकीत महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चरचे गव्हर्निंग कौन्सिल मेंबर्स महिंद्र रायसोनी, अरविंद दहाड, दिलीप गांधी, नितीन इंगळे, मेंबर्सशीप कमिटी चेअरमन विनोद बियाणी, सदस्य संजय शहा यांच्यासह चेंबर्सचे सदस्य आणि उद्योजक उपस्थित होते.

बैठकीत औद्योगिक वसाहतींना महानगरपालिका व एमआयडीसी अशा दोन्ही यंत्रणांकडून कर भरावा लागत असल्याने उद्योजकांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली. या दुहेरी कर वसुलीला त्वरित आळा घालावा, अशी मागणी उद्योजकांनी केली. याशिवाय, जिल्ह्यात नवीन एमआयडीसी विकसित करण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनांवरही चर्चा करण्यात आली. श्री. ललित गांधी यांनी उद्योजकांच्या मागण्यांना समर्थन देत शासनस्तरावर आवश्यक निर्णय घेण्यासाठी लवकरच पुढाकार घेतला जाईल, असे स्पष्ट केले. त्यांनी जळगाव जिल्ह्यातील उद्योगवाढीसाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

## Meeting with Mr. Thomas De Beule, Chief Operating of A-Law International Law Firm, Belgium

A glimpse of the meeting with Mr. Thomas De Beule, Chief Operating Officer (COO) of A-Law International Law Firm, Belgium. On behalf of the Maharashtra Chamber, Shri Shanker Shinde, Vice President of MACCIA, Mumbai II, was also present at the Maharashtra Chamber Head Office in Mumbai.

The discussion focused on exploring collaboration opportunities with Maharashtra Chamber of Commerce, Industry, and Agriculture. This initiative aims to strengthen economic ties between Belgian and Indian companies, providing an excellent platform for fostering business partnerships.





## हार्दिक अभिनंदन

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रीकल्चरचे सदस्य **सीए डॉ. संजय बुरड** यांची इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय), नवी दिल्ली यांनी २०२५-२६ या वर्षासाठी जीएसटी आणि अप्रत्यक्ष कर समितीमध्ये विशेष निमंत्रित म्हणून नियुक्ती केली आहे. महाराष्ट्र चेंबरतर्फे हार्दिक अभिनंदन !

# सुनहरे पल...


MACCIA
ESTD 1927
Apex Chamber of the State
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE
नूतनीकृत मुख्यालय शुभारंभ
सहकारी व शासकीय औद्योगिक वसाहती राज्यस्तरीय परिषद
शुक्रवार, २० जून २०२५
यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई
CELEBRATING 100 YEARS
100
MACCIA
ESTD 1927
Apex Chamber of the State
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE







**Date of Publish : 24th July 2025** **Page No. 1 to 76**
WPP License No.: GR/KLP/114/2024-2026 License to post without prepayment. Posted on 24th July 2025 at RMS Kolhapur
Registered with Reg. of News Paper for India, Delhi under Regd. No. 20803/71, Postal Registration No. KLR-357/2024-2026
















हे मासिक संपादक, मुद्रक, प्रकाशक ललित गांधी यांनी मालक महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर यांचेकरीता शिवम ऑफसेट,प्लॉट नं. डी-१११, फाइव स्टार एमआयडीसी, कागल-हातकणंगले, कोल्हापूर येथे छापुन बिझनेस हाऊस, १६७७, ई मेन रोड, राजारामपुरी १० वी गल्ली, कोल्हापूर - ४१६००८ येथे प्रसिध्द केले.

If undelivered please return to:
Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture
201, Sarda Sankul, Vakil Wadi, M.G. Road, Nashik-1